साऊथ इंडियन / पावभाजी / पंजाबी डिशेस / छोले भटूरे / पावभाजी / मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या पसंतीस उतरलेला साऊथ इंडियन
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..

संस्थापक के. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा
रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. १०.०३.२०२६ | अंक नं. २८२ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

समता पतसंस्था
टेन्शन नाही, रिटर्न्स निवडा!
ठेवींवर मिळवा १०% पर्यंतचे व्याज
*नियम व अटी लागू
अहिल्यानगर : मार्केट यार्ड | प्रेमदान चौक | दिल्लीगेट | संपर्क : ७७२२ ०७० २२२ | www.samatapat.com

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# नगरमध्ये '१०० रुपयांच्या स्टॅम्प'चा तुटवडा; नागरिकांची विविध कामे रखडल्याने नाराजी

नगर – सध्या मार्च एण्ड कालावधी सुरू असून विविध शासकीय व बँकिंग कामांसाठी नागरिकांना १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरची मोठ्या प्रमाणावर गरज भासत आहे. मात्र ऐन मार्च एण्डच्या तोंडावरच १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरचा तुटवडा निर्माण झाल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांसह इतर सर्वसामान्यांची बँकिंग कामे, ॲफिडेव्हिट, घोषणापत्र, करारनामा, हमीपत्र अशी विविध कामे अडकून पडली आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरचा साठा १८ फेब्रुवारी रोजी जिल्हा कोषागार कार्यालयाला उपलब्ध झाला होता. मात्र या स्टॅम्प पेपरची पडताळणी करण्यासाठी आवश्यक असलेला स्टॅम्प सिरीज नंबर अद्याप प्राप्त झालेला नाही. स्टॅम्प पेपरवर छापला जाणारा हा सिरीज नंबर म्हणजे त्या स्टॅम्पचा युनिक (एकमेव) ओळख क्रमांक असतो. या क्रमांकाच्या आधारे स्टॅम्प पेपरची सत्यता आणि वैधता तपासली जाते. संबंधित सिरीज नंबरची फाईल जिल्हा कोषागार कार्यालयाला प्राप्त न झाल्यामुळे या स्टॅम्प पेपरचे वितरण अद्याप सुरू करता आलेले नाही. परिणामी स्टॅम्प विक्रेते व संबंधित कार्यालयांकडून नागरिकांना स्टॅम्प पेपर देणे शक्य होत नसल्याचे सांगण्यात येत आहे.

दरम्यान, मार्च एंडच्या पार्श्वभूमीवर बँकिंग व कायदेशीर कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी स्टॅम्प पेपरची मागणी वाढलेली असताना हा तुटवडा निर्माण झाल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे. संबंधित विभागाने लवकरात लवकर स्टॅम्प पेपरचे वितरण सुरू करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### स्टॅम्प पेपरचा १५ दिवसांपासून तुटवडा : बाळासाहेब भंडारी

सध्या मार्च एण्ड असल्यामुळे विविध कामासाठी १०० रुपयांचा स्टॅम्प लागतो. मात्र, प्रशासनाकडून विक्रेत्यांना १०० रुपयांचे स्टॅम्प न आल्यामुळे नागरिकांनाही स्टॅम्प मिळत नाही. गेल्या १५ दिवसांपासून ज्येष्ठ नागरिक स्टॅम्पसाठी दररोज विक्रेत्यांकडे जात आहेत. मात्र, त्यांना स्टॅम्प मिळत नाहीत. प्रशासनाने तातडीने हे स्टॅम्प उपलब्ध करुन द्यावेत, अशी मागणी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष बाळासाहेब भंडारी यांनी केली.

### एक–दोन दिवसात स्टॅम्प वाटप करणार : रविंद्र काजळकर

जीएसओ ऑफिसमधून १०० रुपयांच्या स्टॅम्पचा स्टॉक व्हेरिफाय करुन आलेला आहे. मात्र, त्या स्टॅम्प पेपरच्या सिरीज नंबरची फाईल अद्याप आलेली नाही. त्यामुळे या स्टॅम्पचे विक्रेत्यांना वाटप करता आलेले नाही. आमच्याकडून पाठपुरावा सुरु आहे. एक–दोन दिवसात ती फाईल आली की आम्ही तात्काळ वाटप सुरु करणार आहोत, अशी माहिती अप्पर कोषागार अधिकारी रवींद्र काजळकर यांनी दैनिक नवा मराठाशी बोलताना दिली.

# गढूळ पाण्याचा पुरवठा होत असल्याने मनपात आंदोलन

नगर – महापालिकेकडून गेल्या काही दिवसांपासून अस्वच्छ व गढूळ पाण्याचा पुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. पिण्यायोग्य पाणी मिळत नसल्यामुळे नागरिकांना घरातील कामे तसेच दैनंदिन व्यवहार बाजूला ठेवून स्वच्छ पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी १० मार्चला महापालिकेत आंदोलन केले.

प्रभाग क्रमांक १७ मधील कायनेटिक चौक परिसरात नळातून येणारे पाणी गढूळ व दुर्गंधीयुक्त असल्याच्या तक्रारी नागरिकांनी वारंवार नगरसेवकांकडे केल्या होत्या. महापालिका प्रशासनाकडेही केल्या होत्या. गढूळ पाण्यामुळे पिण्याचे पाणी वापरणे अशक्य होत असून आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली. त्यामुळे स्वच्छ पाण्याची व्यवस्था करण्यासाठी नागरिकांना इतर ठिकाणी जावे लागत असून मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर संतप्त नागरिकांनी थेट महापालिकेत जाऊन अधिकाऱ्यांना जाब विचारला. यावेळी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्यावर नागरिकांनी प्रश्नांचा भडिमार केला. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला.

यावेळी नगरसेवक मनोज कोतकर यांनी नागरिकांच्या समस्या आयुक्तांसमोर मांडल्या. त्यांच्यासह जालिंदर कोतकर आणि सुमित लोंढे यांनीही परिसरातील पाणीपुरवठ्याच्या समस्येबाबत तक्रारींचा पाढा वाचत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

दरम्यान, परिसरात स्वच्छ व नियमित पाणीपुरवठा करण्यात यावा, गढूळ पाण्याचे कारण शोधून तत्काळ दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली. समस्या तातडीने सोडवली नाही तर आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

(छायाचित्र पान २ वर)

SREF
Shri Ramkrishna Education Foundation's
SETH NANDALAL DHOOT ENGLISH MEDIUM SCHOOL & MOHANLAL RAMAUTAR MANDHANA ARTS, COMMERCE & SCIENCE JUNIOR COLLEGE
S. No. 27/3, Bhavaninagar, Ahilyanagar. Ph. 0241- 2450801, 9011770598 / 9561674412
(SSC/ HSC Board Pattern) (Recognised by Govt. of Maharashtra)
ADMISSIONS OPEN FOR ACADEMIC YEAR 2026-27
Nursery, LKG, UKG, Std I to VII ( Limited seats) & Junior College
Salient Features :
• NEP 2020 aligned Curriculum • Excellent infrastructure
• Well Trained Staff • Smart class rooms
• Field visits / Adventure Camp
• Talking walls with beautiful pictures
• Playground • Regular Yoga • Music Room
• Drawing Room • Teaching with joyful activities
• Celebration of all festivals • Hygienic environment
• Holistic approach towards personality development of student • Computer access with internet facility for everyone.
• Regular Parenting Workshop & Career Counselling for Secondary Classes. • e-Library under Centre of Excellence
JUNIOR COLLEGE
IT & Vocational Electronics is available in Science stream..
Various extra activities along with guidance from CA Umesh Dodeja for Commerce Stream.
Application form can be obtained from the school office between 10.00 am to 1.00 pm. on all working days.
Mrs. R.R. Jeurkar, Principal | Dr. S. B. Kolte, Secretary | Mr. S. R. Dhoot, President | Mr. Nandkumar Jhawar, Chairman E.C.

JOIN ONLY IN 4500/-
DiSHA Computer Institute
MS-OFFICE TALLY PRIME ADV. EXCEL 3 Month | CORELDRAW PHOTOSHOP CANVA 3 Month
CAD 2D CAD 3D PHOTOSHOP 3 Month | C LANG C++ HTML 3 Month
ENROLL NOW...
Other Courses Also In 4500/-
Core Python | Adv Python | Core Java | Adv Java
SQL & PL SQL | Power BI With Excel | Digital marketing
9371051769 | 9371151769 | 7447761769

गुढीपाडवा व रमजान निमित्त खास ऑफर
मयुरी लेडिज मॉल
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
फक्त ₹500/- | किंमतीचे ₹600/-
मर्यादित स्टॉक

MAHAVEERA TVS
Ride with Pride
गुढी पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा!!
महावीरा TVS घेऊन आले आहे गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर खास ऑफर
बुकिंग केल्यावर हमखास तुमच्या पसंतीचा एक आकर्षक गिफ्ट मिळवा!
मिक्सर ग्राइंडर
टेबल फॅन
सीलिंग फॅन
भव्य लकी ड्रॉ
कोणतीही टीव्हीएस व्हीकल खरेदी करा आणि मोफत टीव्हीएस जेस्ट जिंका!
नियम आणि अटी लागू
* लकी ड्रॉ विजेता *
महावीर जयंती अर्थात मंगळवार दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी सायं. ५.०० वाजता जाहीर केले जातील
अधिक माहितीसाठी संपर्क - 9800721212/9102892121
सिद्धी लॉन्सच्या शेजारी, एमआयडीसी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर - ४१४१११
ही ऑफर 4 मार्च ते 19 मार्च पर्यंत उपलब्ध आहे

भारतातील मिनी स्विझर्लंड
बेस्ट ऑफ काश्मिर
₹ 53,000
६ दिवस
राजलक्ष्मी हॉलिडेज्
प्रसाद श्रीकांत मांडरे
9112384842, 9850063432

महेंद्र पेढावाला
रजवाडी गुजराती थाळी
पार्सल सुविधा उपलब्ध
रेल्वे पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय
स्पेशल आमरस 400/- किलो
कापड बाजार, अहिल्यानगर.

नित्य चेहऱ्यावर हास्य फुलवित अहोरात्र परिश्रम घेणारे आपणच आहात...
संचालक साहेब...
आमचे परममित्र
मा. श्री. विकासजी मोकाटे पाटील
संचालक, इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, अहिल्यानगर विभाग
आपले हार्दिक अभीष्टचिंतन!
वाढदिवस शुभेच्छा
-: शुभेच्छुक :-
ईकॅम, महाराष्ट्र
अहिल्यानगर विभाग

CHAMPIONS
ICC MEN'S T20 WORLD CUP 2026
T20 वर्ल्ड कप जिंकल्याबद्दल संपूर्ण इंडियन टिमचे हार्दिक अभिनंदन..
हा आनंद आपणही साजरा करा चंदुकाका ज्वेल्स सावेडी मधील सुवर्णखरेदीने..
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹888/-
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# गृहिणी

## आरोग्य

### मधुमेहींसाठी...

बटाटे बहुतेकदा मधुमेहासाठी सर्वात मोठे कारण मानले जातात, परंतु संशोधन असे दर्शविते की सर्व बटाटे सारखे तयार केले जात नाहीत. काही बटाट्याच्या जातींमध्ये प्रतिरोधक स्टार्च असतो, जो पचण्यास मंद असतो. जेव्हा ते तळले जातात (जसे की फ्रेंच फ्राईज किंवा टिक्कीमध्ये) किंवा जास्त मसाल्यांसह खाल्ले जातात तेव्हा समस्या आणखी वाढते. तज्ञांचे म्हणणे आहे की बटाटे उकळवून नंतर थंड केल्याने त्यांच्या स्टार्चची रचना बदलते, ज्यामुळे ते रक्तातील साखरेच्या पातळीसाठी कमी हानिकारक बनतात. गोड चव असूनही, मधुमेहींसाठी गोड बटाटे हा एक चांगला पर्याय मानला जातो. त्यात भरपूर फायबर असते, जे कार्बोहायड्रेट्सचे पचन मंदावते. शिवाय, त्यातील जीवनसत्त्वे अ, क आणि अँटीऑक्सिडंट्स इन्सुलिन प्रतिरोधक क्षमता सुधारण्यास मदत करतात. आयुर्वेद त्यांना उर्जेचा संतुलित स्रोत मानतो, जर ते मर्यादित प्रमाणात सेवन केले तर फायदेशीर ठरतो.

## पाककला

### बदाम चॉकलेट बाईटस्

**साहित्य :** बदाम-१ वाटी अक्खे किंवा काप केलेले, डार्क किंवा मिल्क चॉकलेट-२०० ग्रॅम तुकडे केलेले, मध किंवा गूळ पावडर- २ चमचे, साजूक तूप किंवा बटर-१ छोटा चमचा मीठ चिमूटभर

**कृती :** सर्वात आधी एका कढईत बदाम मध्यम आचेवर ५-७ मिनिटे खमंग भाजून घ्या. बदाम कुरकुरीत झाले की ते एका प्लेटमध्ये काढून थंड होऊ द्या. आता एका पातेल्यात पाणी उकळायला ठेवा. त्यावर दुसरे काचेचे किंवा स्टीलचे भांडे ठेवा त्या भांड्यात चॉकलेटचे तुकडे आणि तूप घालून ते पूर्णपणे वितळेपर्यंत हलवत राहा. चॉकलेट एकदम स्मूथ झाले की गॅस बंद करा. वितळलेल्या चॉकलेटमध्ये भाजलेले बदाम आणि चिमूटभर मीठ टाका. सर्व बदाम चॉकलेटमध्ये व्यवस्थित घोळले जातील याची खात्री करा. आता एका ट्रेवर बटर पेपर किंवा फॉईल पेपर लावा. चमच्याच्या साहाय्याने थोडे थोडे मिश्रण पेपरवर अंतरा अंतरावर ठेवा. हा ट्रे फ्रिजमध्ये ३० ते ६० मिनिटांसाठी ठेवा, जेणेकरून चॉकलेट चांगले सेट होईल.

## वास्तू

### असा असावा उंबरठा?

स्वयंपाकघर आणि घराच्या मुख्य दारावर उबंरठा असायलाच हवा. खरे तर लाकडी दाराचा उंबरठा शुभ मानला जाते, पण जर तुम्हाला हवे असेल तर तुम्ही तुमच्या जीवनशैलीनुसार संगमरवरी उंबरठा बनवू शकता. वास्तविक दाराच्या चौथ्या भागाला उंबरठा म्हणतात. असे म्हणतात की दाराचा उंबरठा घरामध्ये घाण आणि नकारात्मकता प्रवेश करू देत नाही. ते अधिक पवित्र बनवण्यासाठी मुख्य दारावर ओम आणि स्वस्तिक ही धार्मिक चिन्हे लावावीत.

## सौंदर्य

जर तुम्हाला केस धुवायचे नसतील तर केसांना चांगल्या प्रकारे हेयर सीरम लावा. यामुळे तुमच्या केसांवर एक लेयर तयार होईल. ज्यामुळे केस सुरक्षित राहतील.

## सल्ला

✻ भाजीला फोडणी देताना नेहमी गॅसची आच कमी ठेवा. यामुळे फोडणी चांगली होते आणि भाजीला चांगली चव येते.

✻ शेपूची भाजी बनवताना त्यात थोडा पालक चिरुन घालावा. याने शेपूचा उग्र वास कमी होतो.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. ११ मार्च २०२६

**कालाष्टमी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, फाल्गुन कृष्णपक्ष, ज्येष्ठा २२।००, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : कायदेशीर सल्ल्यासाठी वकिलांना भेटायला चांगला दिवस. वैवाहिक आयुष्य आजच्या इतकं सुखद कधीच नव्हतं, याची प्रचिती तुम्हाला येईल.

**वृषभ** : ज्यांची किंमत वाढतच जाणार आहे अशा वस्तूंच्या खरेदीसाठी आजचा दिवस शुभ आहे.

**मिथुन** : तुमच्या हृदयाला आवाहन करतील अशा एखाद्या व्यक्तीशी भेट होण्याचा जबरदस्त योग आहे.

**कर्क** : आरोग्य बरे राहील. सर्जनशील व्यक्तींना वाव मिळेल. दिवस आनंदात व्यतीत होईल. आर्थिक विषयांमध्ये आपले प्रयत्न आपणास यश मिळण्याचे कारण ठरतील.

**सिंह** : शत्रू पराभूत होतील. आज आपणास कठोर श्रम करावे लागेल. काही निष्कारण चिंतांमुळे आपली व्यग्रता वाढेल.

**कन्या** : ध्येय साध्य करण्यात पूर्ण यश मिळेल. कौटुंबिक विषयांमध्ये वेळ चांगला जाईल.

**तूळ** : आरोग्य उत्तम राहील. काहीकाळ कठीण गेल्यानंतर यश मिळेल. आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल.

**वृश्चिक** : आपण पूर्वीपासून आपल्या मनात असलेल्या योजनेबद्दल अतिउत्साही आहात. आर्थिक विषयांमध्ये आपले प्रयत्न आपणास यश मिळण्याचे कारण ठरतील.

**धनु** : आपल्या आवडी-निवडींप्रमाणे कार्य करण्यासाठी आजचा दिवस सर्वांत उत्तम आहे. शत्रू प्रभावहीन होतील.

**मकर** : दिवस संमिश्र जाईल. आर्थिक नुकसानीची शक्यता आहे. आरोग्याची काळजी घ्या. व्यस्त राहाल. मानसिक स्थिरता वाढेल.

**कुंभ** : जर आपणास आपले निवासस्थान बदलण्याची इच्छा असेल तर आजचा दिवस उत्तम आहे.

**मीन** : व्यापाऱ्यांसाठी परिस्थिती साधारण. जोडीदाराशी वादविवाद टाळा. कौटुंबिक विषयांमध्ये पैसा खर्च होईल.

## शब्दगंध क्र. ७३८४ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | ५ | ६ |
| ७ | | ■ | ८ | ९ | | | |
| १० | | ■ | ११ | | | ■ | ■ |
| १२ | | ■ | | ■ | १३ | १४ | १५ |
| ■ | ■ | १६ | | १७ | ■ | १८ | |
| १९ | | | ■ | | ■ | २० | |
| | ■ | २१ | | | ■ | | ■ |
| २२ | | | ■ | | ■ | २३ | |

**आडवे शब्द :-** १) विश्वासघात करणारा ४) सारखेपणा; एकरूपता; बरोबरी; नि:पक्षपातपणा ७) आवाज; ध्वनी; नाद ८) समुद्र; सागर १०) एक समसंख्या; एका तपातील वर्षांची संख्या ११) तळपाय किंवा तळहात १२) इंग्रजी धाव १३) लक्ष्मीपती; विष्णू १६) आकाश; नभ; अंबर १८) महादेव; प्रत्येक; शंकर; दर १९) तराजूसारखे एक वाहन २०) दांत; सुळे २१) कमाईतील थोडाथोडा भाग बाजूला काढून जमा करणे; सेव्हिंग २२) अप्रीती; आवड नसणे २३) बरोबर; स्वच्छ; समोर; सरळ

**उभे शब्द :-** १) राजाने बोलाविलेली किंवा भरविलेली सभा २) गावात तयार झालेला ३) चिनी मातीच्या पेल्यात पाणी घालून त्यातून सप्तस्वर काढणारे वाद्य ४) विविध सणांचे दिवस ५) मला ६) गायनातील स्वरांचा काळ किंवा मेळ; पाण्याचा बंधारा ९) अंगावरील मारल्याची खूण; लांबट उठा १४) कृपा; आशीर्वाद १५) सहा ऋतूंपैकी एक १६) गोंधळ; गलबला; गलका; गदारोळ १७) नव्याने; अलीकडे; अलीकडचे १९) मनीषा; इच्छा; आकांक्षा

### शब्दगंध क्र. ७३८३ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| रु | गा | ल | य | ■ | उ | क | ल |
| ख | ■ | मा | म | ले | दा | र | ■ |
| व | र | ण | ■ | क | स | क | स |
| त | मा | ■ | वा | रू | ■ | री | म |
| ■ | प | ट | की | ■ | खा | त | र |
| प्र | ती | क | ■ | ग | ट | ■ | भू |
| का | ■ | म | ज | ज | ■ | मा | मी |
| श | त | क | ■ | ल | क | वा | ■ |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार** : संघर्ष रडवतो पण आयुष्य घडवतो.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### कोणता साप मोठा आहे, टायटानोबोआ की ॲनाकोंडा?

सापांचे जग अविश्वसनीयपणे आकर्षक आणि रहस्यमय आहे. निसर्गात अनेक प्रकारचे साप आहेत, त्यापैकी काही त्यांच्या आकार आणि ताकदीसाठी प्रसिद्ध आहेत. आज आपण दोन महाकाय सापांबद्दल चर्चा करू: टायटानोबोआ आणि ॲनाकोंडा. या दोन सापांपैकी कोणता साप खरोखर सर्वात मोठा होता हे जाणून घेणे मनोरंजक आहे. येथे, आपण तुम्हाला या दोन महाकाय सापांबद्दल तपशीलवार सांगू.

**टायटानोबोआ - प्राचीन काळातील महाकाय साप -**

टायटानोबोआ त्याच्या आकार आणि ताकदीत इतर कोणत्याही जिवंत सापापेक्षा मोठा होता. सुमारे ६० दशलक्ष वर्षांपूर्वी तो प्राचीन दक्षिण अमेरिकेतील वर्षावनात राहत होता. टायटानोबोआची लांबी सुमारे ४२ फूट आणि वजन १,१३५ किलोग्रॅम होते. ही संख्या आज जिवंत असलेल्या कोणत्याही सापापेक्षा खूपच मोठी होती.

या सापाचा आकार त्याच्या काळातील उष्ण आणि दमट वातावरणाशी जुळवून घेण्यात आला होता. शास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे की टायटानोबोआच्या ताकदी आणि लांबीमुळे तो कासव आणि लहान मगरींसारख्या मोठ्या प्राण्यांची शिकार करू शकला. टायटानोबोआचे शरीर इतके मोठे आणि मजबूत होते की तो सहजपणे त्याचा शिकार पकडू शकत होता.

हिरवा ॲनाकोंडा म्हणून ओळखला जाणारा ॲनाकोंडा हा आजचा सर्वात मोठा जिवंत साप आहे. तो दक्षिण अमेरिकेतील वर्षावनांमध्ये आढळतो आणि त्याच्या प्रचंड आकारासाठी प्रसिद्ध आहे. ॲनाकोंडा खूप मोठे होऊ शकतात, परंतु टायटानोबोआइतके मोठे नसतात. एक सामान्य ॲनाकोंडा २० फूट लांबीपर्यंत पोहोचू शकतो, परंतु काही ३० फूटांपर्यंत पोहोचलेले आढळले आहेत. ॲनाकोंडा त्याच्या आकार आणि ताकदीसाठी प्रसिद्ध आहे. तो मोठ्या माशांची, मगरींची, अगदी रानडुक्करांची आणि हरणांचीही शिकार करतो. त्याचा आकार इतका मोठा आहे की त्याच्या नैसर्गिक वातावरणात तो कोणताही मोठा आव्हान देत नाही. ॲनाकोंडाचे वैशिष्ट्य म्हणजे तो खूप शांत आणि मंद असतो, परंतु जेव्हा धोका असतो तेव्हा तो अत्यंत धोकादायक ठरू शकतो.

टायटानोबोआ आणि ॲनाकोंडा यांच्या आकारातील फरक

आता प्रश्न असा उद्भवतो: टायटानोबोआ की ॲनाकोंडा, कोणता साप मोठा होता? जेव्हा आपण या दोन्ही सापांची तुलना करतो तेव्हा हे स्पष्ट होते की टायटानोबोआ ॲनाकोंडापेक्षा खूपच मोठा होता. टायटानोबोआची लांबी सुमारे ४२ फूट होती, तर सर्वात मोठा ॲनाकोंडा सुमारे ३० फूट लांब होता. शिवाय, टायटानोबोआचे वजन ॲनाकोंडापेक्षा खूपच जास्त होते, १,१३५ किलोग्रॅमपर्यंत पोहोचले, तर ॲनाकोंडाचे वजन सुमारे ५०० किलोग्रॅम होते.

### अज्ञाधारक मंत्री

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका घनदाट जंगलात कावळ्यांचे एक मोठे साम्राज्य होते. त्या कावळ्यांपैकी एक कावळा त्या सर्वांचा राजा होता. तो सर्वांना त्यांच्या सुख-दुःखात साथ देत असे. इतर कावळेही त्याचे पालन करत असत. एकदा कावळा आपल्या पत्नीसोबत राजाच्या राजवाड्यावर उडत होता. कावळ्याच्या पत्नीला राजवाड्यात स्वादिष्ट मासे शिजवताना पाहून तिच्या तोंडाला पाणी सुटले.पण पहारा खूप कडक होता. म्हणून ती तिथून थेट तिच्या घरट्यात परत आली. दुसऱ्या दिवशी कावळा आपल्या पत्नीला म्हणाला, मला भूक लागली आहे, चला अन्न शोधायला जाऊया. त्याची पत्नी म्हणाली, मला फक्त राजवाड्यात शिजवलेले मासे खायला हवे आहे, नाहीतर मी माझा जीव देईन. पत्नीचे बोलणे ऐकून कावळा काळजीत पडला.

तेवढ्यात त्याच्या दरबारातील मंत्री आला. तो म्हणाला, राजा नमस्कार! काय झाले आहे? तुम्ही काही काळजीत हरवले आहात असे दिसते. कावळ्याने आपल्या मंत्र्यांना सर्व काही सांगितले. मंत्री म्हणाला, काळजी करू नकोस राजा. मी राणीचे आवडते जेवण आणतो. कावळा राजाला नमस्कार करत राजवाड्याकडे उडून गेला. त्याने आपल्यासोबत पाच शक्तिशाली आणि बुद्धिमान कावळेही घेतले. सर्व कावळे राजवाड्याच्या स्वयंपाकघराच्या वर बसले. मंत्री कावळ्याने आपल्या सर्व साथीदारांना आदेश दिला की स्वयंपाकी राजाला जेवणाची थाळी घेऊन येताच मी माझ्या चोचीने त्याच्या डोक्यावर मारीन. तुम्ही दोघे आपल्या चोचीत भात ठेवा आणि तुम्ही तिघेही आपल्या चोचीत मासे ठेवा आणि उडून जा.

मंत्र्याचा कावळा त्याच्या योजनेनुसार स्वयंपाक्यावर हल्ला केला. बाकीचे कावळेही त्यांचे काम करून पळून गेले. पण, मंत्री कावळा पकडला गेला. त्याला राजासमोर हजर करण्यात आले. राजाने त्या कावळ्याला विचारले, तू माझ्या अन्नावर का झडप घातलीस? मंत्री कावळा म्हणाला, महाराज! माझ्या राज्याच्या राणीने तुला वाढलेले मासे आणि भात खावे हवे आहे अशी मागणी केली होती.

मी माझ्या राणीला वचन दिले होते की, मला माझा जीव द्यावा लागला तरी मी तुला नक्कीच अन्न देईन. म्हणूनच मी हे केले. जर तुम्हाला हवे असेल तर तुम्ही आम्हाला कोणत्याही प्रकारे शिक्षा करू शकता. आदेश ऐकून राजा म्हणाला, अशा आज्ञाधारक मंत्र्याला बक्षीस मिळाले पाहिजे. सोडून द्या त्याला. कावळा राजाला नमन करून उडून गेला.

तात्पर्य : माणसाने त्याच्या कर्तव्याशी प्रामाणिक आणि निष्ठावान असले पाहिजे.

## जीवन का अमृत (भाग १)



पवित्र पुस्तकों से नहीं मिल सकती। जैसे ज्योति, ज्योति से आती है, ऐसे ही जीवन, जीवन से आता है। आत्मा को अवश्य ही किसी महान आत्मा की दया दृष्टि के द्वारा जिंदगी का उभार प्राप्त करना होगा । सिर्फ किताबी ज्ञान या बौद्धिक विकास रूहानियत को जागृत नहीं कर सकता। किताबों को पढ़ने से बुद्धि को तो खुराक जरूर मिलती है, पर आत्मा को नहीं। यही कारण है कि हम में से हर एक रूहानियत के बारे में धारा प्रवाह बोल सकता है, पर हमारी वास्तविक

### जिंदकी में कोई प्रमाण नही

जिंदगी में इसका कोई प्रमाण नहीं मिलता है।

५६. एक महान आत्मा से जिंदगी का दान पाकर ही एक आत्मा जीवंत हो सकती है। आप ऐसी महान आत्मा या इंसान को किसी भी नाम से पुकार सकते हैं, पर ऐसा इंसान जरूरी है। हर धर्म ने ऐसे इंसान की जरूरत पर जोर दिया है। तरह, वह सदा अपना दोस्ताना हाथ आगे बढ़ा देता है।

५९. रूहानी तौर पर यह हमेशा फायदेमंद रहता है कि आप सतुरु का कहा माने और उसकी इच्छा और खुशी को समर्पित रहें। पूर्ण समर्पण से उसकी दया जागृत होती है और जो उस पर विश्वास करते हैं, वे इनाम पाते हैं। हर वस्तु, जो आपके पास दिव्य विधान में आती है, सदा आपकी रूहानी तरक्की के लिए सही होती है।

६०. सतुरु अपने दर्शनों द्वारा दया बरसाता है, जिसे उत्सुक लोग पकड़ लेते हैं। उसकी आँखे प्रेम के आश्चर्यजनक झरने हैं। मुझे यह सुनकर खुशी हुई कि जब सतुरु आपके साथ थे, तो आपके हृदय में तीव्र खुशी और प्रेम का अहसास हुआ। ऐसे शिष्य वास्तव में धन्य हैं।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाते म्हणजे दोन आत्म्यांतील संपर्क

सुरेश ओबेरॉय : बहुतेक वेळा माझे शब्द ही माझी निर्मिती असते, पण इतर वेळेस मात्र माझी इच्छा नसताना दिल्या गेलेल्या त्या सामान्य प्रतिक्रिया असतात. शिवानीदीदी : पण ह्या प्रतिक्रिया कोणाच्या असतात ?

सुरेश ओबेरॉय : त्या इतरांच्या कृतीला आपोआप दिल्या गेलेल्या प्रतिक्रिया असतात. जसं, डोळ्यात किडा जात असेल तर आपले डोळे आपोआप मिटले जातात.

शिवानीदीदी : तुमचे शब्द ही प्रतिक्रिया असू शकते पण ती आपोआप दिली गेलेली नसते. एक उदाहरण बघू या. एखादा किडा जर तुमच्या डोळ्यात जात असेल तर शरीर आपोआपच प्रतिक्रिया देतं. आता असा विचार करून बघा: पुढच्या वेळेस जेव्हा परत असा प्रसंग घडेल तेव्हा मी स्तब्ध बसेन. असं घडू शकतं का?

सुरेश ओबेरॉय : हो, मी असं करू शकतो.

शिवानीदीदी : याचाच अर्थ आपल्याकडे पर्याय उपलब्ध आहे. आपण जेव्हा अज्ञानावस्थेत कृती करतो तेव्हा आपण पूर्वापार चालत आलेल्या पद्धतींप्रमाणे कृती करतो. जसं, किडा डोळ्यात जाणार आहे हे समजताच शरीर प्रतिक्षिप्त प्रतिक्रिया देतं. अगदी तसंच, कोणीतरी आपल्याशी काहीतरी वेडंवाकडं बोलतं आणि आपण त्यावर प्रतिक्रिया देतो. ही विचार करण्याची, वागण्याची आणि जगण्याची नेहमीची पद्धत आहे. एखादी कृती आपण अनेक दिवस करत राहिलो की तिची सवय होते आणि आपल्या स्वयंचलित पद्धतीचा भाग बनून जाते. मग आपल्याला असं वाटतं की गोष्टी आपोआप घडत आहेत. पण आज जर आपण जाणीवपूर्वक असं ठरवलं आणि निश्चित केलं की, या परिस्थितीवर वेगळ्या प्रकारे प्रतिक्रिया द्यायची आहे. तर अशा वेळी आपण आपल्या कर्माची निवड करतो. आधी आपण सजग झालो आणि मग आपल्याला काय करायचं आहे हे ठरवलं. अशा प्रकारे आपण आपली जबाबदारी घेतो. वारंवार असं केल्याने ही निवड आपली सवय बनेल आणि स्वयंचलित प्रतिसादही. याचा अर्थ, आपल्या सवयी आपण ठरवतो.

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

प्रत्येक अश्रुचा अर्थ दुःख होत नाही,
दूर राहुन कधी प्रेम कमी होत नाही,
वेळी-अवेळी होतात डोळे ओले कारण
.आमच्याकडे 'कांदा' कापल्याशिवाय 'पोहे' होत नाहीत.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ कोणत्या राज्याच्या फॉरेस्ट प्रोजेक्टला पुरस्काराने गौरविण्यात आले आहे? - नागालॅण्ड

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### कच्ची करवंदे

सावधानता : कच्ची करवंदे खाऊ नयेत. त्यामुळे पोटात गुबारा धरला जातो. डोंगरकड्यांमध्ये करवंदे नैसर्गिकरीत्या पिकत असल्यामुळे सहसा या फळापासून दुष्परिणाम होत नाहीत. फक्त ही फळे खाण्यापूर्वी स्वच्छ धुऊन घ्यावीत. आपण बाजारात मिळणारी महागडी फळे पुष्कळ खातो व करवंदांसारख्या रानमेवा फळांकडे दुर्लक्ष करतो. परंतु शक्य होईल तेव्हा करवंदांसारख्या फळांचा आस्वाद जरूर घ्यावा.

कवठ : कठीण कवच असलेल्या फळाला मराठीमध्ये 'कवठ', संस्कृतमध्ये 'दधिफल' किंवा 'कपित्थ', ९ इंग्रजीमध्ये 'वुड ॲपल', तर शास्त्रीय भाषेमध्ये 'एगल मारमेलस' या नावाने ओळखले जाते. कवठ हे फळ रुटेसी या कुळातील आहे.

कवठ हे फळ सहसा ग्रामीण भागात उपलब्ध होत असल्याने शहरी भागामध्ये बऱ्याचजणांना हे फळ व त्याचे औषधी गुणधर्म माहीत नाहीत. कवठ वृक्षाची उंची साधारणत: २० ते ३० फुटांपर्यंत असते. कवठाची साल ही हिरवट पांढऱ्या रंगाची, खरबरीत व जाड असते. त्याची पाने आकाराने बारीक असतात. कवठ फळातील आतील गर विटकरी (चॉकलेटी) रंगांचा असून, चवीला आंबट-गोड असतो. त्याचा उपयोग सहसा चटणीसाठी, सरबतासाठी, मुरांबा व जॅमसाठी करतात. बऱ्याच वेळेला फळाच्या गरामध्ये गूळ घालून पोळीसोबत खाणे अनेकजण पसंत करतात.

औषधी गुणधर्म : १) कवठामध्ये 'क' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असते. त्यामुळे याच्या सेवनाने रोगप्रतिकारक शक्ती वाढते. 'क' जीवनसत्त्व, लोह, कॅल्शिअम, पिष्टमय पदार्थ, फायबर अशी सर्व पौष्टिक मूलद्रव्ये कवठामध्ये असतात.

२) सालीच्या आतमधील गर खाण्यासाठी वापरत असल्यामुळे नैसर्गिकरीत्याच जंतूपासून या फळाचे संरक्षण होते.

उपयोग : १) कवठ हे मधुर, आम्लरसाचे असल्यामुळे भूक कमी लागत असेल, तर याच्या सेवनाने' मदत होते.

२) अरुची, मळमळ, उलटी या विकारांवर कवठ सेवनाने रुची निर्माण होऊन ही लक्षणे कमी होतात. ३) कवठ हे स्तंभनकार्य करीत असल्यामुळे जुलाब होत असतील, तर कवठ सेवनाने जुलाब कमी होतात.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# हक्क आणि न्यायासाठी महिलांनी कृतीला गती द्यावी

## ॲड. निर्मला चौधरी यांचे प्रतिपादन, महिला कामगारांमध्ये हक्काची जाणीव करुन देऊन महिला दिन साजरा

नगर – महिलांना हक्क व न्याय मिळवण्यासाठी स्वतः खंबीर होणे आवश्यक आहे. जागतिक महिला दिनानिमित्त जगभरातील महिलांसाठी हक्क आणि न्याय मिळवण्यासाठी कृतीला गती द्या ही संकल्पना देण्यात आली आहे. त्या संकल्पनेनुसार महिलांनी आपले अधिकार जाणून घेत त्यासाठी सक्रियपणे लढा दिला पाहिजे. स्त्री–पुरुष समानतेचा विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवून महिलांनी परावलंबित्वातून स्वावलंबनाकडे वाटचाल करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन ॲड. निर्मला चौधरी यांनी केले.

त्या पुढे म्हणाल्या की, समाजातील निराधारत्व कमी करून महिलांनी स्वतः सक्षम बनत कुटुंब आणि समाजाला आधार देण्याची भूमिका घ्यावी. तसेच स्वतःच्या आरोग्याकडे वेळेवर लक्ष देऊन निरोगी जीवन जगणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आयुष्यात घेतलेले संकल्प प्रत्यक्ष कृतीत उतरवून यशाच्या दिशेने सातत्याने प्रयत्न करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.





लाल बावटा बिडी कामगार युनियन, महिला समुपदेशन केंद्र व न्यायाधार संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

लाल बावटा बिडी कामगार युनियन, महिला समुपदेशन केंद्र व न्यायाधार संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हक्क, न्याय मिळविण्यासाठी कृतीला गती द्या! या ब्रीदवाक्याखाली जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमातून महिलांना त्यांच्या हक्कांविषयी जागरूक करण्याबरोबरच न्याय मिळवण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले.

तोफखाना येथील लाल बावटा बिडी कामगार युनियनच्या कार्यालय परिसरात झालेल्या या कार्यक्रमाला विडी कामगार महिलांसह परिसरातील महिलांनी उपस्थिती लावली. न्यायाधार संस्थेच्या अध्यक्षा ॲड. निर्मला चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला.

यावेळी महिला समुपदेशन केंद्राच्या मुख्य समुपदेशक शकुंतला लोखंडे, महिलांसाठी सातत्याने कार्य करणाऱ्या समाजसेविका सुमन काळापहाड, लाल बावटा विडी कामगार युनियनच्या उपाध्यक्ष कॉ. भारती न्यालपेल्ली, शोभा बिमन, संगीता कोंडा, सगुना श्रीफल, सुमित्रा जिंदम, बालमनी मीना, शारदा बोगा, माया चिल्का, पद्मा चाटला, शोभा आकुल, भाग्यलक्ष्मी गड्डम तसेच न्यायाधार संस्थेच्या सदस्या गौतमी भिंगारदिवे, शबाना शेख, ॲड. सुनिता गोरडे, ॲड. शुभांगी चौधरी, मयुरी भोर, दीक्षा देशमुख आदी उपस्थित होत्या.

महिला समुपदेशन केंद्राच्या मुख्य समुपदेशक शकुंतला लोखंडे यांनी महिलांना केंद्राच्या कार्याची माहिती दिली. कौटुंबिक व सामाजिक अडचणींमध्ये अडकलेल्या महिलांना समुपदेशन, मार्गदर्शन व कायदेशीर मदत देण्याचे काम केंद्रामार्फत केले जाते, असे त्यांनी सांगितले. अनेक महिलांना घरगुती हिंसाचार, आर्थिक अडचणी, कौटुंबिक मतभेद यांसारख्या समस्यांना सामोरे जावे लागते. अशा वेळी महिलांनी भीती न बाळगता समुपदेशन केंद्राचा आधार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कॉ. भारती न्यालपेल्ली यांनी महिलांना दैनंदिन आयुष्यात येणाऱ्या विविध अडचणींबाबत मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या की, समाजात महिलांना अनेक प्रकारच्या प्रश्नांना सामोरे जावे लागते, मात्र त्या परिस्थितीत खचून न जाता धैर्याने मार्ग शोधणे आवश्यक आहे. शिक्षण, संघटन आणि जागरूकता यांद्वारे महिलांनी स्वतःला सक्षम बनवावे, असे त्यांनी सांगितले. यावेळी सुमन काळापहाड, गौतमी भिंगारदिवे तसेच ॲड. सुनिता गोरडे यांनीही महिलांना हक्क, आरोग्य व स्वावलंबन याविषयी मार्गदर्शन केले. ॲड. शुभांगी चौधरी यांनी आभार मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## आटपाट नगर होतं

'कहाणी' हे मराठी कथाविश्वातील एक रसाळ आणि प्रासादिक दालन आहे. कहाणीची भाषा ओघवती आहे. रचना संवादात्मक आहे तर आशय प्रबोधनाचा आहे. सामान्यांच्या बोली भाषेत काव्यात्मक शैलीत, गद्यातील गेयता साधणारी मराठीतील कहाणी तिच्यातील शब्दमाधुर्याबरोबरच गेयमाधुर्याने अधिक खुलते. तिच्यातील वाक्ये साधी, सोपी आणि लयबद्ध आहेत. म्हणूनच प्रत्येक कहाणी ही आपल्याशी बोलते आहे असे वाटते.

छोट्या छोट्या वाक्यातून कहाणीतील पात्रे आणि व्यक्तिरेखा या आपल्याशीच बोलू लागतात आणि व्रतवैकल्याने नटलेलं श्रावणाचं वैभव उभं राहातं. आजी अंगणात नाही तर देवळाच्या सभामंडपात बसून कहाणी सांगायची आणि सारं वातावरण श्रावणमय होऊन जायचं. निसर्गाने शोभिवंत झालेला श्रावण महिना कहाणीतून अधिकच साजिवंत व्हायचा. धरित्रीच्या कहाणी, आदित्यराणुबाईची कहाणी, सोमवारची कहाणी, नागपंचमीची कहाणी, मंगळागौरीची कहाणी अशा या साऱ्या कहाण्या पावसाने चिंब भिजलेल्या श्रावणाला शब्दांतही न्हाऊ घालतात.

साठा उत्तराची कहाणी ही शब्द, विचार आणि तत्त्वबोधाने प्रवाहित होऊन सहज वाहणाऱ्या झऱ्याप्रमाणे, स्वाभाविकपणे वाहत वाहत पांचा उत्तरी सुफल संपूर्ण व्हायची. मौखिक साहित्य परंपरेशी जोडलेली कहाणी तिच्यातील स्वाभाविक शब्दलालित्याने मराठी साररचनात आपले एक वेगळे स्थान निर्माण करते.

कहाणीची भाषा अतिशय सोपी. कहाणीतील पात्रांच्या तोंडी टाकलेले बोली भाषेतील संवाद कहाणीलाच बोलके करतात. भाषेची लय आणि गद्यातही यमक साधल्याने कहाणी पद्यमय होऊन जाते. 'उतू नको, मातू नको, घेतला वसा टाकू नको' किंवा 'करा रे हंकारा पिटा रे डांगोरा, नगरात कुणी आहे का उपाशी?' यासारखी कहाणीतील असंख्य वाक्ये कवितेच्या ओळीसारखी वाटतात.

'ऐका शुक्रवारा तुमची कहाणी' असे म्हणत ज्याची कहाणी आहे त्यालाच ती ऐकायला बोलावतात. निसर्ग दर्शनाची अनेकविध रूपे श्रावण उभे करतो तर त्याच श्रावणाच्या सांगाती मानवी भावदर्शनाचे विविध पैलू कहाणीतून उभे राहतात. श्रावणाचं आणि कहाणीच असं नातं आहे. आज तो रम्य श्रावणही 'परदेशी' झाला आहे आणि मुक्तपणे माहेरी नांदणारी कहाणी सासुरवाशीण झाली आहे. – **किशोर गांधी**



राधाबाई काळे महिला महाविद्यालयात महिला दिन साजरा करण्यात आला.

# राधाबाई काळे महिला महाविद्यालयात महिला दिन साजरा

नगर – राधाबाई काळे महिला महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग व सावित्री मैत्रेयी फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर थोपटे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला दिनानिमित्त 'स्त्रीत्व, कर्तव्य आणि सामर्थ्याचा जागर' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. मनिषा निफाडे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

Give to Gain ही या महिला दिनाची थिम होती. स्त्रियांना संधी, सन्मान आणि पाठबळ दिल्यास त्या समाजाच्या प्रगतीत मोठे योगदान देऊ शकतात. तसेच स्त्री ही कुटुंब व समाजाच्या प्रगतीची महत्त्वाची आधारस्तंभ आहे, असे प्रतिपादन प्रा. मनिषा निफाडे यांनी केले.

डॉ. भूपेंद्र निकाळजे यांनी आधुनिक काळातील स्त्रिया या शिक्षण, क्रीडा, विज्ञान, साहित्य या सर्वच क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहेत. तसेच स्त्री सशक्तीकरणाचा संदेश त्यांनी मनोगतातून मांडला.

डॉ. मंजुश्री भागवत यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शुभांगी ठुबे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार डॉ. अनुजा अब्दुले यांनी केले. या वेळी महाविद्यालयाचेज्युनिअर विभागाचे प्रा. अनिल जाधव, डॉ. सचिन कोतकर, डॉ. भास्कर निफाडे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक उपस्थित होते.

# 'सिद्धी पॅरामेडिकल' येथे महिला दिनानिमित्त विविध स्पर्धा

नगर – सिद्धी पॅरामेडिकल इन्स्टिट्यूट येथे आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थिनींसाठी व महिला कर्मचाऱ्यांसाठी विविध स्पर्धा व कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमांमध्ये रंगोली स्पर्धा, भाषण स्पर्धा, आरोग्य जनजागृती उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादींचा समावेश होता. कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विजेत्या विद्यार्थिनींना व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र व बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

महिलांच्या सन्मानासाठी आणि त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.




सिद्धी पॅरामेडिकल इन्स्टिट्यूट येथे आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. विजय लोखंडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून विजयाताई बारसे उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राहुल लुंकड, ओम लगड, वैष्णवी सालालकर, वैभवी पेंढारकर, शाहिस्ता शेख आदींनी परिश्रम घेतले.

# रात्रशाळेतील महिलांच्या संघर्षमय शिक्षणप्रवासाला सलाम : अनुराधा देशमुख

नगर – महिलांनी त्यागाची भूमिका सोडून प्रगती साधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. स्वतःवर प्रेम करावे आणि शिक्षण, आरोग्य व व्यक्तिमत्त्व विकासावर भर दिल्यास यश मिळते. शिष्यवृत्ती मिळालेल्या विद्यार्थिनींनी या संधीचे सोने करून स्वतःमधील क्षमता ओळखावी, असे अनुराधा देशमुख यांनी आवाहन केले.

रात्रशाळेत प्रवेश घेऊन जीवनातील अनेक अडचणींवर मात करत शिक्षणासाठी संघर्ष करणाऱ्या महिला व युवतींसह त्यांना शिक्षण देणाऱ्या महिला शिक्षिकांचा आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त गौरव करण्यात आला. शहरातील हिंद सेवा मंडळाच्या भाई सथ्था नाईट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मासूम संस्थेच्या वतीने रात्रशाळेतील महिला व युवतींना शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षणासाठी तब्बल ८ लाख रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात आली. ही शिष्यवृत्ती मिळवणाऱ्या महिला व युवतींचा देखील यावेळी विशेष सन्मान करण्यात आला.



महिला दिनानिमित्त मासूम संस्थेकडून रात्रशाळेत शिकणाऱ्या विद्यार्थिनी व शिक्षिकांचा गौरव करण्यात आला.

पेमराज सारडा ज्युनिअर कॉलेजचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला हिंदुस्तान पेट्रोलियम गॅस वितरक अनुराधा देशमुख, आडसुळ इंजिनिअरींग कॉलेज डेप्युटी ऑफिस सुप्रिटेंडंट सौ. शकुंतला पाटील, ॲड. शुभांगी रोहोकले, नाईट हायस्कूल चेअरमन प्रा. ज्योतीताई कुलकर्णी, प्राचार्य सुनिल सुसरे, शालेय समिती सदस्य विलास बडवे, शिक्षक प्रतिनिधी मंगेश भुते, शिक्षकेतर प्रतिनिधी कैलास बालटे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविकात ज्योतीताई कुलकर्णी म्हणाल्या की, रात्रशाळेत महिलांची संख्या मोठ्या प्रमाणावर असून महिला व युवती कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत शिक्षण घेत आहेत. या रात्रशाळेतील विद्यार्थिनींनी राज्याच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवून अभिमानास्पद कामगिरी केली आहे. मुलगी लग्नापूर्वी आणि लग्नानंतर दोन्ही कुटुंब उजळून टाकते. जीवनात आत्मविश्वासाने पुढे जाण्यासाठी नियमित व्यायाम व चांगला आहार महत्त्वाचा आहे. महिलांचे आरोग्य चांगले असल्यास त्या संपूर्ण कुटुंबाची काळजी घेऊ शकतात. ज्या घरात महिलांचा मान–सन्मान राखला जातो, तेथे लक्ष्मी प्रसन्न राहते, असे त्या म्हणाल्या. पाहुण्यांचे स्वागत प्राचार्य सुनील सुसरे यांनी केले.

शकुंतला पाटील म्हणाल्या की, प्रत्येक दिवशी महिलांचा सन्मान झाला पाहिजे. संसाराची जबाबदारी सांभाळून रात्रशाळेत शिक्षण घेणाऱ्या महिलांचे कार्य कौतुकास्पद आहे. जीवनात विपरीत परिस्थिती आल्यास न डगमगता परिस्थितीचा धैर्याने सामना करा आणि गुरुजनांचा आदर राखा. आयुष्यात अनेक परीक्षा येतात, त्यांना आत्मविश्वासाने सामोरे जाणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

ॲड. शुभांगी रोहोकले म्हणाल्या की, लग्नानंतर महिलांनी आपले करिअर थांबवू नये. शिक्षणामुळे आत्मनिर्भरता मिळते. सासर कसे असेल याची शाश्वती नसल्याने शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहणे आवश्यक आहे. शेवटपर्यंत शिक्षणच आपल्याला तारणार आहे. केवळ डिग्रीसाठी नव्हे तर ज्ञानासाठी शिक्षण घ्या आणि जीवनात यशाकडे झेप घ्या, असा संदेश त्यांनी दिला. तसेच त्यांनी वन स्टॉप सेंटरची माहिती देऊन कौटुंबिक हिंसाचाराविरोधात महिलांच्या हक्कांची जाणीव करून दिली.

अध्यक्षीय भाषणात डॉ. पारस कोठारी म्हणाले की, प्रत्येकाच्या यशस्वी जीवनामागे एक स्त्री असते. स्त्री ही समाजात विविध भूमिका निभावत पुरुषाच्या पाठीशी खंबीरपणे उभी असते. त्यामुळे स्त्रीचा सन्मान करणे हे समाजाचे कर्तव्य आहे. तसेच रात्रशाळेतील विद्यार्थ्यांसाठी मासूम संस्थेच्या विविध योजनांची माहिती त्यांनी दिली.

यावेळी मासूम संस्थेच्या चेअरमन निकिता केतकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या आणि शिष्यवृत्तीचा लाभ घेऊन जीवनात उंच भरारी घेण्याचे आवाहन केले. विलास बडवे यांनी महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात अनुराधा देशमुख व शकुंतला पाटील यांनी रात्रशाळेसाठी आर्थिक मदत दिली. विद्यार्थिनी संध्या डोईफोडे, स्वाती दुनगु, शीला सुंबे यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी समाजातील बालविवाहमुक्त व बालकामगारमुक्त समाज घडविण्यासाठी उपस्थितांनी शपथ घेतली. तसेच शालेय समिती सदस्य विलास बडवे यांची हिंद सेवा मंडळ संस्थेच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद पवार यांनी केले, तर मासूम संस्थेचे पदाधिकारी व उपस्थितांचे स्वाती होले यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शालेय शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### मासूम संस्थेकडून रात्रशाळेतील महिलांना ८ लाख रुपयांची शिष्यवृत्ती

रात्रशाळेतील महिला व युवतींना विविध व्यावसायिक प्रशिक्षणासाठी मासूम संस्थेच्या वतीने एकूण ८ लाख रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात आली. ॲडव्हान्स फॅशन डिझाईनिंग (प्रत्येकी ४९ हजार) रामेश्वरी जाधव, अश्विनी अंबे, दिव्या बोगा, पूजा शेळके, खुशी पाटील, ममता लक्षेटी, वैशाली साठे.

आरी वर्क कोर्स (प्रत्येकी २० हजार) बबीता साळवे, गीता गोहेर, तृप्ती जगताप, वैशाली शेलार, संध्या खोमणे, स्वाती दुनगु, स्नेहल गीते.

संगणक कोर्स (प्रत्येकी २३ हजार) भाग्यश्री चरकु, संध्या डोईफोडे, मंगला रांधवन, मंदा भोराडे, सुनिता लकशेट्टी, ओम काळे, अनिरुद्ध कुलकर्णी, अनिरुद्ध देशमुख, आकाश गायकवाड, मीनल डोळस, काजल चांदेकर. डीएमएलटी (प्रत्येकी ६४ हजार) माई फाजगे.

# उन्हाळी हंगामासाठी पाणी मागणीचे अर्ज २४ मार्चपर्यंत सादर करावेत

नगर – नाशिक पाटबंधारे विभागाच्या कार्यक्षेत्रातील विविध धरणे व कालव्यांमधून उन्हाळी हंगाम सन २०२५–२६ साठी उभी हंगामी चारा पिके, ऊस व फळबागांसारख्या बारमाही पिकांना पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या पाण्याचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या लाभधारक शेतकऱ्यांनी व पाणी वापर संस्थांनी नमुना क्रमांक ७ वरील अर्ज संबंधित सिंचन शाखा कार्यालयात २४ मार्च पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत, असे आवाहन नाशिक पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता सो. अ. शहाणे यांनी केले आहे. निर्धारित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

हा पाणीपुरवठा गोदावरी उजवा व डावा तट कालवा, गंगापूर डावा तट कालवा, आळंदी उजवा व डावा तट कालवा तसेच पालखेड उजवा तट कालवा यांच्या लाभक्षेत्रात करण्यात येईल. याशिवाय दारणा, गंगापूर, मुकणे, भावली, वाकी, भाम, कडवा, वालदेवी, गौतमी–गोदावरी, काश्यपी व आळंदी आदी धरणांच्या जलाशयांवरून; तसेच दारणा, गोदावरी, कडवा व आळंदी नद्यांच्या पात्रातून आणि गोदावरी नदीवरील विभागाच्या अधिपत्याखालील एकूण १० कोल्हापुरी बंधाऱ्यांच्या ठिकाणावरून प्रवाही व उपसा सिंचनाद्वारे हे पाणी दिले जाईल.

धरणांमधील उपलब्ध पाण्यातून प्रथम पिण्याच्या पाण्याची गरज भागवली जाईल आणि उर्वरित पाण्यातून शेतीसाठी कालव्यांच्या आवर्तनानुसार पाणीपुरवठा करण्यात येईल. त्यामुळे शेतकऱ्यांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा तसेच ठिबक व तुषार यांसारख्या सूक्ष्म सिंचन पद्धतींचा अधिकाधिक वापर करावा.

# उच्चशिक्षित महिलांनी 'ती' च्या साठी उभारले मोठे एम्पायर... आव्हानात्मक असलेला व्यवसाय सांभाळतात फक्त महिलाच...

## रेवती धापटकर आणि अमृता जाधव यांची यशोगाथा

८ मार्चला संपूर्ण जगभरात 'जागतिक महिला दिन' महिलांच्या सन्मानार्थ जगभरात उत्साहात साजरा केला जातो. संपूर्ण जगाच्या लोकसंख्येपैकी महिलांचं प्रमाण जवळपास निम्मं आहे. महिला कोणत्याही बाबतीत मागे नाहीत. त्यांनी प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. प्रत्येक ठिकाणी महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून उभ्या आहेत. समाजाच्या प्रगतीत पुरुषांइतकाच महिलांचाही वाटा आहे, पण तरीही अनेक ठिकाणी महिलांना पुरुषांइतकीच संधी आणि सन्मान मिळत नाही. आजही त्यांना समानतेच्या हक्कासाठी अनेक ठिकाणी झगडावं लागलं, लढावं लागतं.





अहिल्यानगरच्या रेवती दापटकर आणि अमृता जाधव या उच्चशिक्षित महिला रेवती धापटकर यांचे शिक्षण बी.ई. कॉम्प्युटर तर अमृता जाधव या फार्मासिस्ट आहेत मात्र या दोघेही वेगळाच क्षेत्रात भरारी घेत असून अहिल्यानगर मध्ये दिग्विजय इंटरप्राईजेस या कंपनीच्या माध्यमातून पार्किंग मॅनेजमेंटद्वारे विविध ठिकाणी पे ॲण्ड पार्कचा ठेका घेऊन तो ठेका गरजू महिलांच्या माध्यमातून चालवत यशस्वी घौडदौड सुरू आहे. आपले मूळ शिक्षण आणि या व्यवसायात खूप मोठा फरक होता मात्र एक आव्हान म्हणून दोघींनी हा व्यवसाय करायचा ठरवलं आणि त्यात आता त्या दोघी यशस्वी ठरत आहेत. आपल्याबरोबर आणखी गरजू महिलांनाही या क्षेत्रात घेऊन त्यांनी महिलाही कुठे कमी नाहीत हे दाखवून दिलं आहे

पे ॲण्ड पार्क अथवा नो पार्किंग कामाचा ठेका घेऊन महिलांनी चालवणे म्हणजे मोठे जिकरीचे काम आहे. पावलोपावली नागरिकांना नियमांची आठवण करून देत नियम न पाळणाऱ्या नागरिकांना शिस्त लावणे हे मोठे काम असते मात्र रेवती धापटकर आणि अमृता जाधव यांनी सोळा महिलांच्या माध्यमातून हे काम नगर शहरात सुरू केल आहे. या कामासाठी रेवती धापटकर आणि अमृता जाधव यांनी गरजू महिलांचा शोध घेतला तसेच या महिलांना प्रशिक्षण दिले आणि त्यांना उदरनिर्वाहाचे एक साधन म्हणून या सेवेत सामावून घेतले आहे. ज्या महिला घरी बसून होत्या त्याच महिला आता या कामाच्या माध्यमातून दोन पैसे कमवू लागल्यामुळे घर खर्च भागू लागला आहे. तर या महिला काम करत असल्यामुळे त्यांच्यामध्ये एक वेगळा उत्साह निर्माण झालेला आहे. १६ महिलांसह दहा पुरुष या कामासाठी रेवती धापटकर आणि अमृता जाधव यांनी कामगार म्हणून घेतले आहेत. प्रत्येक कामगाराकडे आपल्या घरातील व्यक्ती असल्यासारखं लक्ष धापटकर आणि जाधव घालत असतात. गरजू महिलांना कुठेतरी काम मिळावे यासाठी त्यांनी महिलांना प्राधान्य दिले आहे. त्यामुळे हे एक चांगले पाऊल महिला म्हणून रेवती धापटकर आणि अमृता जाधव यांनी टाकले आहे.

अनेक गरजू महिलांना या ठिकाणी काम मिळाल्यामुळे रेवती धापटकर आणि अमृता जाधव यांनी महिलांना पुरुषांच्या बरोबरीने काम करण्याची संधी देऊन त्यांची सामाजिक आणि आर्थिक ताकद दिली आहे. तसेच कामाच्या ठिकाणी महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि सुरक्षित वातावरण निर्मितीसाठी विशेष लक्ष दिले जाते. अहिल्यानगर शहर हे आपले शहर असून या शहराची ओळख शिस्तीचे शहर म्हणून व्हावी यासाठी रेवती धापटकर आणि अमृता जाधव सध्या कष्ट घेत असून रोज नवीन सुरुवात म्हणून त्या काम करत आहेत. आज नाहीतर भविष्यकाळात निश्चितच शहर बदललेलं दिसेल असा विश्वास दोघींनी व्यक्त केला आहे. काम करताना अनेक अडचणी येतात मात्र सर्व अडचणींवर यशस्वी मात करून अडचण हीच संधी म्हणून रेवती धापटकर आणि अमृता जाधव हळूहळू यशाकडे मार्गस्थ होत आहेत.

महिला दिन हा दिवस केवळ शुभेच्छांचा नसून, महिलांच्या विविध क्षेत्रांतील योगदानाचा आणि त्याद्वारे समाजप्रबोधनाचा एक महत्त्वाचा भाग बनत आहे त्यामुळे संसाराचा गाडा पुढे घेऊन जात असताना आपल्याबरोबर आणखी काही गरजू महिलांचे संसार ओढण्याचा प्रयत्न रेवती धापटकर आणि अमृता जाधव करत आहेत त्यांच्या कार्यास मनापासून सलाम. – **गौतमी भिंगारदिवे**

# केवळ गुगलवर अवलंबून राहून खरा विद्यार्थी घडणार नाही : मुस्कान तलरेजा

**विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला 'जीनियस गॅलरी'तून मिळाला मंच; सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या प्राथमिक विभागाचा उपक्रम**






सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या प्राथमिक विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आणि कल्पकतेला प्रोत्साहन देण्यासाठी 'जीनियस गॅलरी' हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला.

नगर – केवळ गुगलवर अवलंबून राहून खरा विद्यार्थी घडत नाही. विद्यार्थ्यांमध्ये गुगलपेक्षाही वेगवान बुद्धिमत्ता आहे, ती जागृत करण्याची गरज आहे. फक्त इंजिनिअर किंवा डॉक्टर होण्याच्या शर्यतीत धावण्यापेक्षा प्रत्येकाने स्वतःतील क्षमता ओळखून त्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करण्याचे आवाहन मुस्कान तलरेजा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वेगळ्या कल्पनाशक्तीला चालना देऊन स्वतःचा वेगळेपणा सिद्ध करण्याचेही त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

तारकपूर येथील सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या प्राथमिक विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आणि कल्पकतेला प्रोत्साहन देण्यासाठी 'जीनियस गॅलरी' हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत कला, भाषा – इंग्लिश, मराठी, हिंदी,गणित–विज्ञान, भूगोल–पर्यावरण आणि ऐतिहासिक वास्तूंच्या मॉडेल्सचे आकर्षक प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध प्रकल्पांमुळे शाळेचा परिसर सर्जनशीलता आणि नवोपक्रमाच्या वातावरणाने भारावून गेला.

या जीनियस गॅलरीचा शुभारंभ मुस्कान तलरेजा यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी संस्थेचे विश्वस्त सुरेश हिरानंदानी, महेश मध्यान, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका कांचन पापडेजा, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका गीता तांबे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

प्रास्ताविकात बोलताना मुख्याध्यापिका कांचन पापडेजा म्हणाल्या की, जीनियस गॅलरी हे केवळ प्रकल्पांचे प्रदर्शन नसून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा, कुतूहलाचा आणि शिक्षणाचा एक उत्सव आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) २०२० च्या दृष्टिकोनाशी सुसंगत असा हा उपक्रम असून, विद्यार्थ्यांच्या समग्र विकासावर शाळेचा भर आहे. अनुभवात्मक शिक्षण, समीक्षात्मक विचारसरणी, नवोपक्रम आणि कौशल्याधारित शिक्षणाला चालना देण्याचा प्रयत्न या प्रदर्शनातून दिसून येतो.

त्यांनी पुढे सांगितले की, विद्यार्थ्यांनी विज्ञान, गणित, सामाजिक अभ्यास, पर्यावरण जागरूकता आणि कला अशा विविध विषयांवर मॉडेल्स, प्रयोग आणि सर्जनशील प्रकल्प तयार करण्यासाठी मोठी मेहनत घेतली आहे. या प्रक्रियेतून विद्यार्थ्यांनी केवळ ज्ञान मिळवले नाही, तर टीमवर्क, समस्या सोडविण्याची क्षमता आणि वर्गातील शिक्षणाचा प्रत्यक्ष जीवनातील उपयोग कसा करावा हेही शिकवले जात असल्याचे स्पष्ट केले.

गणित–विज्ञान व भूगोल–पर्यावरण प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी विविध प्रकल्प सादर करून आपली कल्पनाशक्ती आणि कौशल्याची झलक दाखवली. विद्यार्थ्यांनी कागदावर कुंचल्यातून साकारलेली चित्रे जिवंत भासत होती. तसेच गड–किल्ले, मंदिरे आणि विविध ऐतिहासिक वास्तूंची मॉडेल्सही तयार करण्यात आली होती.

प्रदर्शनात ज्वालामुखी, शहरातील प्रदूषणमुक्ती, वाहतूक कोंडीवरील उपाय, निसर्ग चक्र, ग्रहांची स्थिती, तारांगण, पाणी बचत, डीएनए मॉडेल, परमाणू संरचना, विद्युत लिफ्ट यांसारख्या प्रयोगांचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी मॉडेल्सद्वारे सादर केले. याशिवाय नैसर्गिक शेती आणि पर्यावरणपूरक शहरांच्या संकल्पनांनीही उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

विद्यार्थ्यांनी हस्तकलेच्या विविध वस्तू तयार करून मोबाईलपासून दूर राहून सर्जनशील छंद कसे जोपासता येतात याचेही उत्तम उदाहरण या प्रदर्शनातून दिले. आकर्षक हस्तकला वस्तू प्रदर्शनाचे विशेष आकर्षण ठरल्या. या प्रदर्शनाला शिक्षक व पालकांनी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी शिक्षक आणि पालकांच्या मार्गदर्शनाखाली विविध कलाकृती व प्रकल्प साकारण्यासाठी परिश्रम घेतले होते.

या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोधर माखिजा तसेच विश्वस्त राजकुमार गुरुनानी आणि हरेष मध्यान यांनी विशेष कौतुक केले.

सूत्रसंचालन कनन शिरवानी आणि गुंजन पंजवानी यांनी केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी नम्रता कुकरेजा, प्रीती कटारिया, करिष्मा नवलानी, अश्विनी देशपांडे, भावना ढाले, पुजा चोपडा, चांदणी सोनग्रा, प्रियंका चारगुंडी, करिष्मा शेख, अमरिंदरकौर ग्रेवाल, अनामिका म्हस्के, नयन तुपे, शुभांगी क्षीरसागर, शुभांगी दादासाहेब पाखरे आणि मेधा कुलकर्णी, पठारे बाबासाहेब व प्रोग्राम कमिटी यांनी परिश्रम घेतले.

# नगरमध्ये १२ मार्च रोजी यशवंतराव चव्हाण जयंतीनिमित्त 'संत तुकोबांची दख्खनी परंपरा' विषयावर विशेष व्याख्यान

**आयआयटी कानपूरचे प्रा. डॉ. समीर चव्हाण मांडणार संशोधनपर विचार**



नगर – आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त शहरात एका विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. यशवंतराव चव्हाण व्यासपीठ आणि आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने १२ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजता न्यू आर्टस् कॉलेजच्या शाहू महाराज ऑडिटोरियममध्ये हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात आयआयटी कानपूर येथील प्राध्यापक डॉ. समीर चव्हाण 'संत तुकोबांची दख्खनी परंपरा' या विषयावर सखोल व्याख्यान देणार आहेत.

यशवंतराव चव्हाण व्यासपीठाचे अध्यक्ष तथा माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे यांनी या कार्यक्रमाची माहिती देताना सांगितले की, संत साहित्याचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांसाठी तसेच साहित्यप्रेमी नागरिक व विद्यार्थ्यांसाठी ही एक अनोखी वैचारिक मेजवानी ठरणार आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

आयआयटी कानपूरसारख्या देशातील सर्वोच्च तंत्रज्ञान संस्थेत गणित आणि सांख्यिकी यांसारख्या विज्ञाननिष्ठ विषयांचे प्राध्यापक असलेले डॉ. समीर चव्हाण यांनी मराठी संत साहित्यावर विशेषतः संत तुकाराम महाराजांच्या साहित्यावर अत्यंत सखोल संशोधन केले आहे. विज्ञानाच्या अभ्यासाबरोबरच संत साहित्याचा त्यांनी घेतलेला व्यापक वेध अनेकांना आश्चर्यचकित करणारा ठरला आहे.

'अखईं ते जालें : तुकाराम : हिंदुस्तानी परिवेशात' हा त्यांचा बहुचर्चित ग्रंथ राज्य शासनाच्या पुरस्काराने गौरविण्यात आला आहे. या ग्रंथातून त्यांनी संत तुकारामांच्या साहित्याचा विचार केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित न ठेवता संपूर्ण भारतीय आणि दख्खनी सांस्कृतिक संदर्भातून केला आहे. तत्कालीन हिंदुस्तानी समाजजीवन, भाषिक परंपरा आणि सांस्कृतिक वातावरणात संत तुकारामांचे स्थान काय होते, याचा त्यांनी अभ्यासपूर्ण उलगडा केला आहे.

गुरुवारी होणाऱ्या व्याख्यानातही डॉ. चव्हाण 'दख्खनी परंपरा' या दृष्टिकोनातून संत तुकोबारायांच्या विचारांचे आणि साहित्याचे विश्लेषण करणार असून, त्यांच्या अभंगांमधील सामाजिक, सांस्कृतिक आणि भाषिक संदर्भांवर नवे प्रकाश टाकणार आहेत.

स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांना साहित्य, संस्कृती आणि वैचारिक चर्चांबद्दल विशेष जिव्हाळा होता. त्यांच्या जयंतीदिनी संत साहित्याच्या अभ्यासाचा असा वेगळा दृष्टिकोन मांडणारे व्याख्यान आयोजित करणे हीच त्यांना खरी वैचारिक आदरांजली ठरेल, अशी भावना आयोजकांनी व्यक्त केली आहे.

या अभ्यासपूर्ण व्याख्यानास साहित्यप्रेमी, विद्यार्थी, प्राध्यापक आणि नागरिकांनी उपस्थित राहून ज्ञानसत्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# संत नामदेव शिंपी समाज ट्रस्टच्या अध्यक्षपदी अशोकराव वडे, उपाध्यक्षपदी विजय काकडे

**सचिवपदी राजेंद्र बगाडे, सहसचिवपदी सुधीर नेवासकर तर खजिनदारपदी कृष्णा भस्मे**



नगर – सावेडी येथील शिंदे मळा परिसरात असलेल्या संत नामदेव शिंपी समाज ट्रस्टची सभा उत्साहात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी अशोकराव होमकर होते. यावेळी ट्रस्टच्या विविध कामकाजाचा आढावा घेण्यात आला. तसेच आगामी उपक्रम ंबाबत चर्चा करण्यात आली. सभेत सर्वानुमते ट्रस्टची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

नूतन कार्यकारिणीत अध्यक्षपदी अशोकराव ज्ञानदेव वडे यांची निवड करण्यात आली असून उपाध्यक्षपदी विजय मधुकर काकडे यांची निवड करण्यात आली. तसेच सचिवपदी राजेंद्र बगाडे, सहसचिवपदी सुधीर नेवासकर, खजिनदारपदी कृष्णा भस्मे यांची निवड झाली. सल्लागारपदी अशोकराव होमकर, प्रमोद गोंदकर व गोविंद बारटक्के यांची नियुक्ती करण्यात आली. निवड झाल्यानंतर पदाधिकार्यांचे सत्कार करण्यात आला.

अशोकराव वडे यांनी यावेळी बोलताना सांगितले की, संत नामदेव शिंपी समाज ट्रस्टच्या माध्यमातून समाजातील धार्मिक परंपरा जपत विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविण्याचा प्रयत्न केला जात आहे. समाजातील सर्व घटकांना एकत्र आणून समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कार्य करण्याचा ट्रस्टचा प्रयत्न राहणार आहे. संत नामदेव महाराज मंदिर परिसरात वर्षभर धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम आयोजित करून समाजातील एकोप्याला बळकटी देण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. तसेच सर्व पदाधिकारी, विश्वस्त व समाजबांधव यांच्या सहकार्याने ट्रस्टचे कार्य अधिक प्रभावीपणे पुढे नेले जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी माजी अध्यक्षा प्रमिला दुमाटे यांच्या कार्यकिर्दीत भरीव कामे झाली, त्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी विश्वस्त श्रीमती अनिताताई वाधवने, दिलीप काकडे, जुगल किशोर वायचळ, अनिल वनारसे, सुनील अवसरकर, प्रवीण पाटसकर, श्रीकांत बुलबुले, महेश चौकटे, विठ्ठल वनारसे, राजू पाटकुले, सुरेश लोळगे, अ‍ॅड. चंदन बारटक्के, दिनेश चौकटे, आदींची पदाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. यावेळी दिलीप वडे, हेमलता वडे, प्रफुलता काकडे, रामदास चौकटे, कृष्णा बारटक्के आदी समाजबांधव उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी उपाध्यक्ष दिलीप काकडे यांनी केले. अ‍ॅड.चंदन बारटक्के यांनी आभार मानले.

# नगरमध्ये १५ मार्चला अत्याधुनिक मॉड्युलर मोफत 'कृत्रिम हात पाय बसविण्यासाठी मोजमाप शिबीर'



नगर – अपघात किंवा इतर कारणांमुळे हात पाय जायबंदी झाले तर आयुष्यात सर्वसामान्य नागरिकांना जीवन जगणे कठीण होते. अशा व्यक्तींसाठी कृत्रिम हात, पाय बसविणे उत्तम पर्याय ठरतो. समाजातील हीच गरज ओळखून नगरमध्ये १५ मार्च रोजी अत्याधुनिक मॉड्युलर मोफत कृत्रिम हात पाय बसविण्यासाठी मोजमाप शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. भारत विकास परिषद, दक्षिण पुणे व पिंपरी चिंचवड शाखा यांच्या वतीने आणि नगरमधील राष्ट्रीय शिक्षण मंडळ यांच्यावतीने मोफत कृत्रिम हात पाय बसवून दिले जाणार आहेत अशी माहिती पुणे येथील टॅक्स प्रॅक्टिशनर अनिल वखारिया व नगरमधील राजेंद्र चोपडा यांनी दिली.

सदर मोजमाप शिबिर सहकार क्षेत्रातील सभागृह जिल्हा बँकेसमोरील राष्ट्रीय शिक्षण मंडळ येथे सकाळी ९ ते दुपारी ३ या कालावधीत होणार आहे. मोजमाप घेतल्यानंतर एक महिन्यात कृत्रिम हात पाय याच ठिकाणी मोफत मिळणार आहेत. या उपक्रमाचा दिव्यांगांनी लाभ घ्यावा असे आवाहन भारत विकास परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या लाभासाठी पूर्व नोंदणी आवश्यक आहे. पूर्व नोंदणी केलेल्यांनाच शिबिरात प्रवेश दिला जाईल. नोंदणीसाठी ९५४५५०४९६४, ९४२१२०९१५४, ९८२३०४७७४४, ८९९९१७९४२२ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

नोंदणी पूर्ण झाल्यानंतर दिव्यांग व्यक्ती आणि त्याच्या सोबतच्या एका व्यक्तीची शिबिराच्या ठिकाणी जेवणाची मोफत व्यवस्था केली आहे. दिव्यांग व्यक्तींनी पूर्व नोंदणी करून या उपक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन भारत विकास परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.

# शहराच्या विकासासाठी आ.संग्राम जगताप यांच्याकडे क्रियाशक्ती व तळमळ

**जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांचे प्रतिपादन, गुलमोहर रोडवरील पथदिव्यांसाठी १ कोटी रुपयांचा निधी, सर्व कामे पूर्ण : महापौर ज्योतीताई गाडे**



गुलमोहर रोड परिसरातील काही चिमुकल्या मुलांनी पथदिवे बसवावेत अशी मागणी पत्राद्वारे आमदार संग्राम जगताप यांच्याकडे केली होती. त्या पत्राची त्वरित दखल घेत जगताप यांनी या भागात अत्याधुनिक पथदिवे उभारले. या पथदिव्यांचे लोकार्पण जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते आणि चिमुकल्या मुलांच्या उपस्थितीत पार पडले.

नगर – शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार संग्राम जगताप आणि भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे यांनी विशेष पुढाकार घेतला असून, येत्या काळात एआय सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शहराच्या विकासासाठी विविध प्रकल्प राबविण्याची योजना आखण्यात येत असल्याचे प्रतिपादन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी केले.

गुलमोहर रोड परिसरातील काही चिमुकल्या मुलांनी पथदिवे बसवावेत अशी मागणी पत्राद्वारे आमदार संग्राम जगताप यांच्याकडे केली होती. त्या पत्राची त्वरित दखल घेत जगताप यांनी या भागात अत्याधुनिक पथदिवे उभारले. या पथदिव्यांचे लोकार्पण जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते आणि चिमुकल्या मुलांच्या उपस्थितीत पार पडले.

या कार्यक्रमाला आमदार संग्राम जगताप, महापौर सौ. ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, नगरसेविका सौ. गौरीताई बोरकर, नगरसेवक ऋग्वेद गंधे, भाजप शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, उद्योजक अमोल गाडे, अजिंक्य बोरकर, नगरसेवक, अधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

यावेळी बोलताना मंत्री राधाकृष्ण विखे म्हणाले की, शहराच्या विकासासाठी निधीची कमतरता नसते, परंतु काम करण्यासाठी क्रियाशक्ती आणि तळमळ असणे महत्त्वाचे असते. ती आमदार संग्राम जगताप यांच्याकडे आहे. चिमुकल्या मुलांच्या पत्राची दखल घेत त्यांनी त्वरित निर्णय घेतला आणि गुलमोहर रोडवर पथदिवे उभारले, ही त्यांची संवेदनशीलता कौतुकास्पद आहे.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, शहराच्या विकासासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे आणि डॉ. सुजय विखे यांचे सहकार्य लाभत आहे. त्यांच्या मदतीमुळेच या पथदिव्यांसाठी निधी उपलब्ध झाला. तसेच डीएसपी चौक आणि प्रेमदान चौक येथे बसविण्यात आलेली नवी सिग्नल यंत्रणा ही मुंबईनंतर नगरमध्येच उभारण्यात आली असून अशा प्रकारचे सिग्नल पुण्यातही नाहीत.

# आई ही संस्काराची पहिली शाळा : डॉ. तात्याराव लहाने

**ऋणानुबंधचा राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा**




ऋणानुबंध संस्थेचा २०२४–२५ चा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा अहिल्यानगर येथील माऊली सभागृहामध्ये पार पडला. यावेळी डॉ. तात्याराव लहाने यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

नगर – प्रत्येक महिला प्रत्येक आई ही मुलाची पहिली शाळा व पहिला गुरु असतो. आई इतके निस्वार्थी या जगात कोणी नाही काम करताना हाताच्या पुसट होत जाणाऱ्या रेषा मुलांचे भविष्य घडवतात असे सांगून डॉक्टर तात्याराव लहाने यांनी त्यांच्या लहानपणापासूनचा जीवन प्रवास श्रोत्यांना कथन केला. ३१ वर्षांपूर्वी दोन्ही किडन्या निकामी झाल्यानंतर त्यांच्या आईने त्यांना किडनी दिली व शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरला ही किडनी नाही चालली तर दुसरीही काढ असे सांगितले, हा प्रसंग ऐकताना उपस्थितांचे डोळे पाणावले. आरोग्य जपण्यासंदर्भात बाबत काही सूचना करताना त्यांनी जंक फूड टाळण्याचे आवाहन केले तर कुठल्याही गोष्टीचा अतिरेक टाळण्याबाबत सांगितले. मोबाईल वापराबाबत त्यांनी विशेष खबरदारी घेण्याचे सांगितले. मोबाईल वापरताना तयार होणाऱ्या लहरी मुळे कॅन्सर सारखे दूर्धर आजार होऊ शकतात. हे सांगतानाच त्यांनी ब्लूटूथ किंवा हेडफोन वापरण्याचे आवाहन केले. झोपताना किंवा मोबाईल चार्ज करताना दूर अंतरावर ठेवण्याबाबत त्यांनी सांगितले. ऋणानुबंधाच्या डिजिटल डिटॉक्स इंडिया या मोहिमेचे कौतुक त्यांनी केले आणि पालकांनी मुलांना अनावश्यक फोन वापरायला देऊ नये हे आवर्जून सांगितले.

ऋणानुबंध संस्थेचा २०२४–२५ चा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा अहिल्यानगर येथील माऊली सभागृहामध्ये पार पडला. यावेळी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात डॉक्टर तात्याराव लहाने बोलत होते. डॉक्टर तात्याराव लहाने यांच्या सव्वा तास चाललेल्या भाषणांनी उपस्थित श्रोत्यांना अक्षरशा खिळवून ठेवले. ग्रामीण भाषा शैली आणि काळजाला भिडणाऱ्या त्यांच्या हृदयस्पर्शी शब्दांनी सर्वांना मंत्रमुग्ध केले. ऋणानुबंध संस्थे च्या कार्याचे कौतुक करत असतानाच महिलांच्या सन्मानाने विशेष आनंद झाल्याचे त्यांनी नमूद केले.

ऋणानुबंध संस्थेचे दरवर्षी दिले जाणारे पुरस्कार यावर्षी महिला दिनाचे औचित्य साधून महिलांना समर्पित होते. सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून समाजाला प्रेरणा देणारे वैशिष्ट्यपूर्ण काम करणाऱ्या समाजातल्या विविध घटकांचा सन्मान या पुरस्काराच्या निमित्ताने ऋणानुबंध करत असते.

सोहळ्यात नेत्ररोग तज्ञ डॉ. तात्याराव लहाने, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, महापौर सौ. ज्योती गाडे, डॉ. गिरीश कुलकर्णी, नितीन उदमले, बेरड सर आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक संस्थेचे सचिव प्रशांत बंडगर यांनी करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

ऋणानुबंधाचे अध्यक्ष अजित रोकडे यांनी ऋणानुबंध व जिल्हा परिषद करत असलेल्या डिजिटल डिटॉक्स इंडिया या मुलांच्या मोबाईल अतिवापराविरुद्ध सुरू असलेल्या मोहिमेची माहिती दिली. आतापर्यंत सुमारे २१० शाळांमधील २१ हजार पालकांचे समुपदेशन पूर्ण झाल्याचे त्यांनी सांगितले. महिला सन्मान सोहळ्यासाठी अत्यंत पारदर्शक पद्धतीने योग्य महिलांची निवड करताना त्यांचा सन्मान केल्याने समाजातील अनेक स्त्रियांना प्रेरणा मिळेल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली पुरस्कार प्राप्त महिला या विविध क्षेत्रात काम करणाऱ्या असून त्यांनी त्या त्या क्षेत्रात नाविन्यपूर्ण काम करून आपल्या कार्याचा ठसा उमटवल्याचे त्यांनी सांगितले.

सन्मान करण्यात आलेल्या महिलांमध्ये पारंपारिक लाकडी वस्तूंचा व्यवसाय ऑनलाइन पद्धतीने करून तो सातासमुद्रा पार नेणाऱ्या जामखेडच्या दैवशाला गुळवे, मवेशी राजुर सारख्या आदिवासी भागात विद्यार्थी आणि आदिवासी महिलांसाठी मोठे काम उभे करणाऱ्या मुख्याध्यापिका मंजुषा काळे, यवतमाळ येथे सरकारी दवाखान्यात भरती झालेल्या रुग्णांना व नातेवाईकांना मोफत भोजन पुरवणाऱ्या सुमनताई सोनवणे, कृषी ड्रोन च्या माध्यमातून शेतात औषध फवारणी करणाऱ्या नीलम दिवेकर, मानस ग्राम स्नेहालयात मुलांच्या डिजिटल व्यसनाधीनतेवर मानसोपचार करणाऱ्या डॉक्टर तेजस्विनी मिस्कीन, नगर मधील डॉक्टर गौरी कुलकर्णी, मुळा धरण परिसरातील शिक्षिका मंदा फलके यांचा ऋणानुबंध राज्यस्तरीय पुरस्काराने गौरव करण्यात आला. श्रीमती रजनी बोर्डे यांचा आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल विशेष सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी आनंद भंडारी यांनी ऋणानुबंधच्या कामाचे कौतुक करून पुरस्कारासाठी निवड झालेल्या महिलांचे अभिनंदन केले. उपस्थित महिला व सर्व प्रेक्षकांना डिजिटल साधनांचा संतुलित वापर करण्यासंदर्भात त्यांनी मार्गदर्शन केले.

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी पुरस्कारासाठी वेगवेगळ्या क्षेत्रातील वेगळं काम उभं करणाऱ्या महिलांच्या निवडी संदर्भात समाधान व्यक्त केले. पुरस्कारप्राप्त महिलांना या पुरस्कारामुळे अधिक चांगले काम करण्याची ऊर्जा प्राप्त होईल व इतरांसाठी त्यांचे काम दिशादर्शक ठरेल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

महापौर सौ. ज्योती गाडे यांनी सर्व सन्मानमूर्तिंचे अभिनंदन करून उपस्थिताना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

उपाध्यक्ष प्राध्यापिका सारिका रघुवंशी यांनी आभार मानले. सूत्रसंचालन भारती कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ऋणानुबंधाच्या कलाकारांनी सुरेख गीत गायन करून उपस्थितांचे मन जिंकून घेतले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सचिन परदेशी, डॉक्टर विवेकानंद कंगे, डॉक्टर खंडागळे, भानुदास महानूर, महेश घावटे, जीवन महाजन, प्रतिभा साबळे, अजय आदमाने, सोमवंशी दांपत्य, वंदना कुलकर्णी, प्राची लाटे, सीमा रघुवंशी, स्वाती कुमठेकर, आंबेकर, विजय मोरे, बाबासाहेब जगताप, मोनाली डॉक्टर झेंडे, उमेशचंद्र सुद्रिक व ऋणानुबंधाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# जोश

फंडू एसएमएस

चाहत वो नहीं जो जान देती है,
चाहत वो नहीं जो मुस्कान देती है,
ऐ दोस्त चाहत तो वो है, जो पानी
में गिरा आँसू पहचान लेती है।

अब तो वो चाकू लेके मेरे
पिछे पडा है, उसे कहा था दिल
चीर के देख ,
तेरा ही नाम होगा

होके मायूस ना यूं शाम से
ढलते रहिये।
जिंदगी भोर है सूरज सा
निकलते रहिये।



# सेंद्रिय उत्पादनातून उभारला व्यवसाय

अचिव्हर

नोएडा येथील सेक्टर १२८ मध्ये राहणारे ऋषी प्रकाश सिंह यांनी बहुराष्ट्रीय कंपनीतील चांगल्या पगाराची नोकरी सोडून लोकांच्या आरोग्यासाठी देशी आणि सेंद्रिय (ऑरगॅनिक) उत्पादने घरपोच पोहोचवण्याचा व्यवसाय सुरू केला आहे. त्यांच्या मते, आपण दररोज ज्या वातावरणात जगतो आहोत, ते अनेक आजारांना आमंत्रण देणारे आहे. याच विचारातून त्यांनी मिलेट्सपासून तयार केलेली उत्पादने बाजारात आणली असून हे त्यांचे स्वप्नही होते.

ऋषी प्रकाश सिंह यांनी १७-१८ वर्षे कॉर्पोरेट क्षेत्रात नोकरी केली. आता त्यांनी नव्या करिअरची सुरुवात करत स्वतःचा व्यवसाय सुरू केला आहे. त्यांनी योडले नावाचा स्वतःचा ब्रँड तयार केला आहे. या ब्रँडचा उद्देश ग्राहकांपर्यंत चांगले आणि आरोग्यदायी अन्नपदार्थ पोहोचवणे हा आहे. आपण नेहमी ऐकत आलो आहोत की पॅकेटबंद अन्न आरोग्यासाठी चांगले नसते आणि काही प्रमाणात ते खरेही आहे, पण त्यांनी केलेल्या संशोधनातून असे आढळले, की प्रत्येक पॅकेट फूड अनारोग्यदायी नसते. विशेषतः कॉर्पोरेट क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना हेल्दी आणि संतुलित आहाराची खूप गरज असते. त्यामुळेच आम्ही हा उपक्रम सुरू केला.

ऋषी प्रकाश सिंह म्हणतात, अनुभवातून आणि आरोग्याविषयीच्या जाणिवेतून मला समजले, की निरोगी राहण्यासाठी मिलेट्सपेक्षा चांगले अन्न नाही. शरीराला आवश्यक असलेले फायबर, प्रोटीन आणि इतर पोषक घटक मिलेट्समध्ये मुबलक प्रमाणात आढळतात. सध्या ते पॅन-इंडिया स्तरावर ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही माध्यमांतून आपली उत्पादने विकत आहेत. भविष्यात परदेशी बाजारपेठेतही ही उत्पादने उपलब्ध करण्याची त्यांची योजना आहे जेणेकरून भारताचे हे 'सुपरफूड' जागतिक बाजारातही पोहोचेल.

लाखोंच्या पॅकेजची नोकरी सोडून त्यांनी हा नवा मार्ग निवडला. दीड दशकाहून अधिक काळ कॉर्पोरेट क्षेत्रात काम करताना मन कंटाळले होते आणि काहीतरी वेगळे व अर्थपूर्ण करण्याची इच्छा होती. त्यांच्या मते, या उपक्रमामुळे ते स्वतःही निरोगी राहतील आणि देशातील लोकांनाही आरोग्यदायी पर्याय मिळेल.

## टेक्नो टॉक

### वायफाय डिस्कनेक्ट होतेय?



आपण स्ट्रीमिंग किंवा गेमिंग करत असू किंवा ऑनलाइन ऑफिस मीटिंग असेल आणि वाय-फाय कनेक्शन अचानक बंद पडलं तर सगळी कामं बिघडतात. याचा परिणाम तुमच्या कामावर तर होतोच, पण या समस्येमुळे बराचसा वेळही वाया जातो. ही समस्या रोजचीच झाली तर तुम्हाला गेमिंग, चित्रपट किंवा वेब सिरीज पाहण्याची इच्छा होत नाही, तसेच कामातही नीट लक्ष लागत नाही. पण वायफाय वारंवार डिस्कनेक्ट होत असेल तर यामागील कारणे काय असू शकतात? तसेच ही समस्या दूर कशी करू शकतो, हे जाणून घेतले पाहिजे.

वाय-फायला खूप जास्त डिव्हाईसेस कनेक्ट केलेले असल्यास कनेक्शन वारंवार बंद पडू शकते. कनेक्ट केलेले डिव्हाइसेस कोणताही डेटा वापरत नसले तरी ते बँडविड्थ वापरतात. हे टाळण्यासाठी अनावश्यक डिव्हाइस डिस्कनेक्ट करा. मजबूत वायफाय कनेक्शनसाठी राउटरची जागा महत्त्वाची आहे. डिव्हाइस राउटरपासून खूप दूर असेल, तर कनेक्शन तुटू शकते. त्याचप्रमाणे राउटर इलेक्ट्रॉनिक डिव्हाइसच्या मागे ठेवले असेल तर त्याचे कनेक्शनदेखील कमकुवत असू शकते. हे टाळण्यासाठी कनेक्शन कोणत्याही मोठ्या अडथळ्याशिवाय डिव्हाइसपर्यंत पोहोचू शकेल अशा ठिकाणी राउटर ठेवा.

कनेक्टेड डिव्हाइसेस मर्यादित केल्यानंतर आणि राउटरचे स्थान बदलल्यानंतरही कनेक्शन ड्रॉप होत राहिल्यास राउटर बदलावा लागू शकतो. बरेच जुने राउटर नवीन सेवांशी सुसंगत नाहीत. म्हणून, रीसेट केल्यानंतर, ते काही काळ काम करतात, परंतु नंतर समस्या पुन्हा दिसून येते. असे होत असेल तर नवीन राउटर घेणे हा सर्वोत्तम पर्याय आहे.

# रेल्वेमध्ये नोकरीची संधी

रोजगारवाटा

रेल्वेमध्ये सरकारी नोकरीचे स्वप्न पाहणाऱ्या लाखो तरुणांसाठी आनंदाची बातमी आली आहे. रेल्वे मंत्रालयाने 'असिस्टंट लोको पायलट' (एएलपी) साठी नवीन भरतीला मान्यता दिली आहे. या निर्णयानंतर भरती प्रक्रिया लवकरच सुरू होण्याची अपेक्षा आहे. भरतीची पूर्णपणे जबाबदारी 'आरआरबी'ची असेल. अर्ज प्रक्रिया ऑनलाइन असेल आणि अधिसूचना जारी होताच उमेदवार फॉर्म भरू शकतील.

या भरती मोहिमेंतर्गत, देशभरातील विविध रेल्वे झोनमध्ये एकूण ११ हजार १२७ पदे भरली जातील. ही भरती मोहीम तांत्रिक क्षेत्रात काम करण्याची इच्छा असलेल्या आणि रेल्वेमध्ये नोकरी करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या तरुणांसाठी मोठी संधी मानली जात आहे. खरंतर एएलपी पद हे रेल्वेमधील सर्वात महत्त्वाच्या आणि जबाबदार पदांपैकी एक मानले जाते.

'एएलपी' पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांकडे ठरावीक शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे. मान्यताप्राप्त बोर्डातून १० वीची परीक्षा उत्तीर्ण होणे तसेच आयटीआय असणे आवश्यक आहे. अभियांत्रिकीमध्ये डिप्लोमा आणि १० वीचे प्रमाणपत्र असलेले उमेदवारदेखील अर्ज करण्यास पात्र आहेत. अभियांत्रिकी पदवी असलेले उमेदवारदेखील सहभागी होऊ शकतात.

या भरतीत सहभागी होण्यासाठी किमान वय १८ वर्षे आहे तर कमाल वय मर्यादा ३० वर्षे आहे. राखीव प्रवर्गातील उमेदवारांना वयात सूट दिली जाईल. ओबीसी उमेदवारांना वयात ३ वर्षांची सूट मिळेल तर एससी आणि एसटी उमेदवारांना पाच वर्षांची सूट मिळेल. माजी सैनिक आणि इतर राखीव प्रवर्गातील उमेदवारांनाही नियमांनुसार सूट मिळेल.

उमेदवारांनी अर्ज करताना विहित शुल्क भरावे लागेल. सामान्य आणि इतर श्रेणींसाठी अर्ज शुल्क ५०० रुपये आहे. एससी, एसटी, माजी सैनिक, ट्रान्सजेंडर आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवारांसाठी शुल्क २५० रुपये आहे. शुल्क ऑनलाइन भरावे लागेल.

'एएलपी' भरतीसाठी निवड प्रक्रिया कठीण असणार आहे. उमेदवारांना अनेक टप्प्यांतून जावे लागेल. प्रथम, संगणक-आधारित चाचणी (सीबीटी-१) असेल. नंतर सीबीटी-२ होईल. त्यानंतर संगणक-आधारित योग्यता चाचणी (सीबीएटी) होईल. या सर्व चाचण्या उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांना कागदपत्र पडताळणीसाठी बोलावले जाईल. अंतिम टप्पा वैद्यकीय तपासणी असेल. सर्व टप्प्यात उत्तीर्ण होणाऱ्यांचीच अंतिम निवड केली जाईल.

'आरआरबी'ने झोननिहाय पदांची माहिती शेअर केली आहे. मध्य रेल्वेमध्ये १,४००, पूर्व मध्य रेल्वेमध्ये ७०० आणि पूर्व तटीय रेल्वेमध्ये १,६२५ पदे आहेत. याव्यतिरिक्त, पूर्व रेल्वेमध्ये ६०८, उत्तर मध्य रेल्वेमध्ये ४५७ आणि उत्तर रेल्वेमध्ये ७४० पदांसाठी भरती केली जाईल. दक्षिण पूर्व रेल्वेमध्ये सर्वाधिक १,५३१ पदे आहेत, ईशान्य सीमांत रेल्वेमध्ये १,२७६ पदे आहेत. दक्षिण रेल्वे, पश्चिम रेल्वे, पश्चिम मध्य रेल्वे आणि इतर झोनसाठीदेखील पदे वाटप करण्यात आली आहेत. याशिवाय चित्तरंजन लोकोमोटिव्ह वर्क्समध्ये काही पदांचा समावेश आहे.




# रोजगाराच्या नव्या संधी

करियर

भारतामध्ये इंजिनीअरिंग आणि आयटी क्षेत्र करिअरसाठी सर्वात उत्तम पर्याय असल्याचे मानले जाते, मात्र एकीकडे मोठ्या टेक कंपन्यांमध्ये लेऑफ्स सुरू असताना दुसरीकडे अनेक क्षेत्रे नव्या रोजगार संधींसह पुढे येत आहेत. काही क्षेत्रांमध्ये तर भरतीत तिपटीने वाढ झाल्याचे दिसून येते. गेल्या काही काळात हेल्थकेअर, इन्फ्रास्ट्रक्चर, नेतृत्व पदे आणि स्पेशलाइज्ड भूमिका या क्षेत्रांत लक्षणीय वाढ झाली आहे.

एका अहवालानुसार, सुरक्षित आणि मागणी असलेल्या नोकऱ्यांमध्ये शल्यचिकित्सक आणि वैद्यकीय अधिकारी यांचा समावेश आहे. विशेषतः त्वचारोगतज्ज्ञ पदासाठी २०२४-२०२५ मध्ये १८२ टक्के वाढ नोंदवली गेली आहे. त्यांचा सरासरी मासिक पगार ९३,४११ रुपये आहे. मध्यमवर्गीयांकडून विशेष वैद्यकीय सेवेवरील वाढता खर्च, मेट्रो आणि टियर-२ शहरांमध्ये विशेष रुग्णालये आणि दवाखाने यांची वाढ, तसेच त्वचेची काळजी आणि जीवनशैली उपचारांची वाढती मागणी यामुळे या क्षेत्रात अनुभवी वैद्यकीय तज्ज्ञांची मागणी आहे.



इतर क्षेत्रांतही मोठी वाढ

क्वांटिटी सर्वेक्षक पदासाठी १९८ टक्के वाढ

रिअल्टर पदासाठी १९१ टक्के वाढ

वरिष्ठ स्थापत्य अभियंते, आर्किटेक्ट आणि इलेक्ट्रिकल डिझायनर्सची भरती

वरिष्ठ स्थापत्य अभियंते, आर्किटेक्ट आणि इलेक्ट्रिकल डिझायनर्सची भरती वरिष्ठ स्थापत्य अभियंत्याचा सरासरी मासिक पगार ४२,५२६ आहे आणि वरिष्ठ आर्किटेक्टचा पगार सुमारे ४८,४५७ आहे.

यामध्ये प्रसिद्ध मुख्य वित्तीय अधिकारी (सीएफओ) यांचा समावेश आहे. या पदासाठी १७१ टक्के वाढ झाली आहे आणि सरासरी मासिक पगार ८२ हजार ५२८ आहे. कंपन्या धोरणात्मक निर्णयांसाठी अनुभवी वित्त तज्ञांना चांगले पगार देण्यास तयार आहेत.

अहवालांनुसार, आयटी क्षेत्र पूर्णपणे समृद्ध नाही, त्याची वाढ फक्त मंदावू शकते. पायथॉन डेव्हलपर्स हे सर्वात जास्त मागणी असलेल्या नोकऱ्यांमध्ये आहेत. सरासरी मासिक पगार ३४ हजार ७९८ आहे. याशिवाय, 'सोशल मीडिया मॅनेजर', 'इंटीरियर डिझायनर' आणि 'ट्रॅव्हल कन्सल्टंट' सारख्या नवीन भूमिकादेखील रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करत आहेत.

## अ‍ॅप वर्ल्ड

### व्हॉट्सअ‍ॅपचे नवे फीचर



वाढदिवसाच्या शुभेच्छा द्यायला विसरता? रात्री उशिरा ऑफिसचा महत्त्वाचा मेसेज पाठवायचा असतो, पण झोप येतेय? आता काळजी सोडा. कारण व्हॉट्सअ‍ॅप लवकरच 'शेड्यूल्ड मेसेजेस' हे एक जबरदस्त नवीन फीचर आणणार आहे. तुम्ही आता मेसेज लिहून ठेवाल, वेळ आणि तारीख सेट कराल आणि तो आपोआप त्या वेळी पाठवला जाईल. या फीचरची सध्या आयफोनच्या बीटा आवृत्तीत चाचणी सुरू आहे. लवकरच ते अँड्रॉइड आणि आयफोन दोघांसाठीही येईल. यासाठी चॅटमध्ये मेसेज टाइप करा, '+' आयकॉन किंवा सेंड बटण दाबा, 'शेड्यूल मेसेज' पर्याय निवडा. त्यानंतर कॅलेंडर आणि घड्याळातून तारीख आणि वेळ ठरवा. मेसेज 'क्यू'मध्ये राहील आणि ती वेळ येताच आपोआप पाठवला जाईल. तुम्ही झोपलेले असाल ऑफिसमध्ये व्यस्त असाल किंवा प्रवासात असाल तरी शुभेच्छा किंवा रिमाइंडर वेळेवर पोहोचेल.

वाढदिवस, वर्धापनदिन, लग्नाच्या तारखा किंवा सणांच्या शुभेच्छा वेळेवर देण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी हे योग्य फीचर आहे. त्यासाठी आता सकाळी लवकर उठून मेसेज पाठवण्याची गरज नाही. ऑफिसमध्ये कामाच्या तणावातही महत्त्वाचे मेसेज शेड्यूल करून ठेवता येतील. आधी लोक यासाठी काही थर्ड पार्टी अ‍ॅप्स वापरत होते, पण त्यात डेटा लीकचा धोका होता. आता हे व्हॉट्सअ‍ॅपचं अधिकृत फीचर असेल.

एंड-टू-एंड एन्क्रिप्टेड म्हणजे पूर्णपणे सुरक्षित. शेड्यूल केलेले मेसेज चॅट इन्फोमध्ये वेगळ्या सेक्शनमध्ये दिसतील. गरज पडल्यास ते डिलीटही करता येतील.

# उंच दिसण्यासाठी फॅशन टिप्स

फॅशन पॅशन

उंची कमी असलेल्या मुली स्वतःला उंच दिसण्यासाठी सहजपणे हील्स घालू शकतात. कमी उंचीचे पुरुष स्वतःला उंच दिसण्यासाठी काही फॅशन टिप्स फॉलो करू शकतात.

रंगाचा फॉर्म्युला

याला 'चीट कोड' असेही म्हणतात. डोक्यापासून पायापर्यंत समान रंग परिधान केल्याने एक अखंड उभी रेषा तयार होते. यामुळे शरीर लांब दिसते. काळा रंग आकर्षक असतो. नेव्ही ब्लू, चारकोल, बेज आणि ऑलिव्ह हे रंगदेखील वापरून पाहू शकता. जास्त प्रयत्न न करता उंच दिसण्याचा हा सर्वात सोपा मार्ग आहे. यासाठी, तुम्ही डेनिमसह टी-शर्ट किंवा कार्गो पॅन्टसह गुळगुळीत स्वेटशर्ट घालू शकता. पोत लूक मनोरंजक ठेवतो, तर रंग स्टायलिश टच जोडतो.

पॅन्ट आणि शूजचे कॉंबिनेशन

उंच दिसायचे असेल, तर तुमच्या पॅन्टशी जुळणारा शूज रंग निवडा. तुमचे शूज पँटपेक्षा पूर्णपणे वेगळ्या रंगाचे असतील तर तुमचे पाय लहान दिसतात. कारण कॉन्ट्रास्ट सुरू होताच नजर थांबते. रंग एकमेकांत मिसळतात तेव्हा तुमचे पाय लांब दिसतात. यासाठी, गडद जीन्ससह गडद शूज घाला. हलक्या रंगाचे शूज हलक्या रंगाच्या डेनिम जीन्ससह घालावेत. तपकिरी स्नीकर्स मातीच्या रंगाच्या ट्राउझर्ससह घालावेत.

स्लिम-फिट पँट वापरून पहा

पुरुष उंच दिसण्यासाठी स्लिम-फिट पँट वापरू शकतात. सैल पँट तुमचे शरीर रुंद बनवतात. रुंदी तुम्हाला लहान बनवते. दुसरीकडे, स्लिम-फिट पँट तुमच्या पायांचा आकार वाढवतात आणि वरच्या दिशेने लक्ष वेधतात. यासाठी, खूप पातळ नसलेल्या आणि त्वचेला चिकटत नसलेल्या पँट निवडा. स्लिम-फिट डेनिम किंवा स्ट्रक्चर्ड कार्गो पँट घालू शकता.



उंच कंबर असलेली पँट घाला

उंची वाढवण्याचा हा आणखी एक प्रभावी मार्ग आहे. उंच कंबर असलेली पँट घालू शकता. कंबरेला थोडीशी वाढ दाखवल्याने पाय लांब दिसतील. यासाठी, उंच कंबर असलेल्या पँटसह आत अडकलेला टी-शर्ट घाला. पर्यायी म्हणून, तुम्ही उंच कंबर असलेल्या डेनिमसह क्रॉप्ड जॅकेट वापरून पाहू शकता.

लांब बाही असलेले कपडे घाला

उंची कमी असेल तर लांब बाही असलेले शर्ट घाला. त्यामुळे हात लांब दिसतात. ते तुमच्या शरीराचे प्रमाण संतुलित करते. यासाठी, लांब बाही असलेले टी-शर्ट, पूर्ण बाही असलेले कॉटन शर्ट किंवा हलके स्वेटशर्ट घालू शकता.

बेल्ट घालणे टाळा.

बेल्ट घालणे तुमच्या पोशाखात मध्यभागी कट करते. यामुळे तुम्ही बुटके दिसू शकता. पँट बेल्टशिवाय चांगली बसत असेल तर बेल्ट घालणे टाळावे. काळ्या पँटसह काळा पट्टा किंवा तपकिरी रंगाचा तपकिरी पट्टा घाला.


# 'प्ले स्टोअर' अधिक सुरक्षित

स्मार्ट टॉक

'गुगल'ने २०२६ मध्ये आपल्या 'प्ले स्टोअर'ला अधिक सुरक्षित बनवण्यासाठी जबरदस्त कारवाई केली आहे. कंपनीने १.७५ दशलक्षाहून अधिक बनावट आणि धोकादायक अ‍ॅप्स प्रकाशित होण्यापासून रोखले. हे अ‍ॅप्स मालवेअरने भरलेले होते. ते वापरकर्त्यांचे पैसे चोरू शकतात नकळत सशुल्क सदस्यता सुरू करू शकतात किंवा वैयक्तिक डेटा चोरू शकतात. या कारवाईत 'गुगल'ने ऐंशी हजारांहून अधिक खराब डेव्हलपर अकाउंट्स कायमचे बंद केले. हे डेव्हलपर्स फसवणूक, घोटाळे आणि नियमांचे उल्लंघन करत होते. आता त्यांना 'प्ले स्टोअर'वर परत येण्याची परवानगी मिळणार नाही. यामुळे भविष्यात असे घोटाळे होण्याची शक्यता खूप कमी झाली आहे.

'गुगल प्ले प्रोटेक्ट' ही कंपनीची मजबूत सुरक्षा व्यवस्था आता दररोज ३५० अब्ज अ‍ॅप्स स्कॅन करते. २०२५ मध्ये 'प्ले स्टोअर'बाहेरील २७ दशलक्ष हानिकारक अ‍ॅप्स ओळखून ब्लॉक करण्यात आले. तसेच २.५५ लाख अ‍ॅप्सना संवेदनशील डेटा अ‍ॅक्सेस करण्यापासून रोखले गेले. हे अ‍ॅप्स वापरकर्त्यांच्या फोनवर पोहोचण्यापूर्वीच पकडले गेले! 'एआय'च्या मदतीने गुगल आता अ‍ॅप्सची तपासणी अधिक चांगली करत आहे. 'अ‍ॅप डेव्हलपमेंट'च्या सुरुवातीपासूनच मालवेअर, स्पायवेअर किंवा फसवणुकीचे प्रकार शोधले जातात. याशिवाय १६० दशलक्ष बनावट रेटिंग्ज आणि पुनरावलोकने ब्लॉक केली. यामुळे खोट्या हाय रेटिंगमुळे लोक फसत नाहीत. भारतात अँड्रॉइड फोन वापरणाऱ्यांची संख्या खूप जास्त आहे. या मोठ्या अपडेटमुळे भारतीय वापरकर्त्यांना थेट फायदा होईल. कमी स्कॅम, कमी मालवेअर आणि जास्त सुरक्षित अनुभव मिळेल.

'गुगल' म्हणते ही कारवाई येथेच थांबणार नाही. भविष्यात 'एआय'ची सुरक्षा आणखी मजबूत होईल. फोनमध्ये संशयास्पद अ‍ॅप असेल, तर लगेच डिलीट करा आणि प्ले प्रोटेक्ट चालू ठेवा. 'गुगल'च्या या डिजिटल स्ट्राइकमुळे फोन आता जास्त सुरक्षित होणार आहे





# हिरव्या वाटेवर

भटकंती

कॉलेजच्या परीक्षा संपल्यावर भटकंतीला सुरुवात होते. या दिवसात बाईकवरून फिरायची संधी असते. भरपूर वेळ असल्याने निसर्गाचा आस्वाद घेत, वळणावळणाच्या रस्त्यावरून अगदी आरामात जाता येतं. बाईकवरून जायचं तर हटके ठिकाणं हवी. दुतर्फा झाडी असलेल्या रस्त्यावरून जाण्याची मजा वेगळीच. यासाठी फार लांब जायची गरज नाही. आपल्या महाराष्ट्रात अत्यंत सुंदर आणि रमणीय ठिकाणं आहेत. अशाच सुंदर ठिकाणापैकी एक म्हणजे ताम्हिणी घाट. हा घाट पुण्याला कोकणाशी जोडतो. या घाटातून जाण्याची खरी मजा पावसाळ्यातच येत असली तरी उन्हाळ्यातही तुम्ही या भागाची सैर करू शकता.

ताम्हिणी ते मुळशीदरम्यानचा हा घाट निसर्गप्रेमींसाठी पर्वणी ठरतो. ताम्हिणीतलं थंड हवेचं ठिकाण खूप प्रसिद्ध आहे. वीकेंडसाठी तर हा घाट बेस्टच. या परिसरात बघण्यासारखं खूप काही आहे. तळी, घनदाट झाडी हे दृश्य मनोहारी दिसतं. मुळशी धरण पाहिल्याशिवाय इथला प्रवास पूर्णच होत नाही. इथे तुम्ही रिव्हर राफ्टिंगचा आनंद लुटू शकता. इथून जवळच कोलाड नावाचं ठिकाण आहे.



कुंडलिक नदीवर बांधण्यात आलेल्या पुलावरून इथे जाता येतं. वंजाई देवीचं मंदिरही पर्यटकांना आकर्षित करतं. इथे आल्यावर सिंहगडाला भेट द्यायला विसरू नका. ताम्हणी घाटाच्या बाईक टूर्सही असतात. इंटरनेटवर याची माहिती मिळू शकेल. मग काय दोस्तांनो, ताम्हिणी घाटाच्या मस्त सफरीला सज्ज व्हा.

# लोखंडी गज, लाकडी दांडक्यांनी पोलिसावर हल्ला; कपडेही फाडले

## बुरूडगावच्या १५ जणांच्या टोळक्यावर खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल

नगर – कंटेनर चालकाला मारहाण करण्याच्या तयारीत असलेल्या टोळक्याला मज्जाव करणाऱ्या पोलिस हवालदारावर १५ जणांच्या टोळक्याने लोखंडी गज, लाकडी दांडक्यांनी प्राणघातक हल्ला करत त्यांच्या खुनाचा प्रयत्न केल्याची घटना ८ मार्च रोजी रात्री ११.४५ च्या सुमारास राहुरी येथील ग्रीन हॉटेल चौक येथे घडली. या टोळक्याने मारहाण करताना पोलिसाचे कपडेही फाडले आहेत. या प्रकरणी बुरूडगाव (ता. नगर) येथील १५ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पो.हे.कॉ. विकास रंगनाथ वैराळ असे या हल्ल्यात जखमी झालेल्या पोलिसाचे नाव आहे. ते ८ मार्च रोजी रात्री खंडू वसंत काळे, वैभव बाबासाहेब तारडे, संतोष अंकुश काळे, महेश निमसे (सर्व रा. बुरूडगाव, ता.नगर) व त्यांच्या समवेत इतर ११ अनोळखी इसम हे सर्वजण महिंद्रा कंपनीची स्कॉर्पिओ (क्र. एम एच १६ सीटी ७०) व आणखी एक विटकरी रंगाची स्विप्ट कारमधील इसम हे राहुरी येथे नगर मनमाड रस्त्याने जात असताना त्यांच्या कारला कंटेनरचा (क्रं. एनएल ०१ एजे १३०८) धक्का लागला म्हणुन त्यावरील चालकाला लोखंडी गज व काठीने मारहाण करण्याच्या तयारीत असतांना व सदरची घटना फिर्यादीचे बीट हद्दीत घडत असल्याने फिर्यादीने त्यांची व्हिडीओ शुटींग केल्याचा मनात राग धरुन या आरोपींनी फिर्यादी वैराळ यांना लोखंडी फायटरने, लोखंडी गजाने, लाकडी दांडक्याने बेदम मारहाण करुन फिर्यादीचा गळा दाबुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला.

तसेच इतर अनोळखी आरोपी यांनी फिर्यादीला लाकडी दांडक्याने, लोखंडी गजाने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यावेळी आरोपी महेश निमसे याने फिर्यादीचा मोबाईल हॅण्डसेट जबरीने चोरुन नेला. या घटने नंतर जखमी झालेल्या हवालदार वैराळ यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे उपचार घेत असताना दिलेल्या जबाबा वरून राहुरी पोलिसांनी या १५ आरोपींच्या विरुद्ध खुनाचा प्रयत्न सरकारी कामात अडथळा अशा विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. यातील खंडू वसंत काळे, वैभव बाबासाहेब तारडे, संतोष अंकुश काळे या तिघांना पोलिसांनी अटक करत स्कॉर्पिओ गाडी जप्त केली आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक समाधान फडोळ हे करत आहेत.

# श्रीमंत बालाजी गणेश मंदिराचा वर्धापनदिन उत्साहात साजरा





नगर – पंचरंग गल्ली, जुने विठ्ठल मंदिरासमोर, तोफखाना परिसरातील श्रीमंत बालाजी गणेश मंदिराचा १४ वा वर्धापनदिन उत्सव पंचरंग युवक मंडळ ट्रस्टच्या वतीने उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. दोन दिवस चाललेल्या या उत्सवात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी उपस्थित राहून मंदिर परिसर भक्तिरसाने न्हाऊन निघाला.

उत्सवाच्या पहिल्या दिवशी सायंकाळी श्री हनुमान चालीसा पठन व भजनसंध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. श्रीरामभक्त हनुमान सत्संग मंडळ, श्रीराम मंदिर, नवीपेठ यांच्या वतीने सादर करण्यात आलेल्या या कार्यक्रमाने उपस्थित भाविकांना भक्तिरसात रंगवून टाकले. हनुमान चालीसाचे सामूहिक पठण, विविध भक्तिगीते व भजनांच्या सादरीकरणामुळे मंदिर परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले.

वर्धापनदिनानिमित्त सकाळी गणेश पूजनाने कार्यक्रमांची सुरुवात झाली. त्यानंतर पारंपरिक वाद्यांच्या गजरात कलश मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत महिला–पुरुष व युवकांनी सहभाग घेतला. पुढे अभिषेक पूजा व विधिवत होम–हवन झाले. वेदघोष आणि मंत्रोच्चारांच्या निनादात पार पडलेल्या या धार्मिक विधींमुळे वातावरण पवित्र आणि आध्यात्मिक झाले. या वर्धापन उत्सवानिमित्त पंचरंग युवक मंडळ ट्रस्टच्या वतीने महाप्रसाद (भंडारा) आयोजित करण्यात आला होता. या महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी परिसरासह शहरातील असंख्य भाविक उपस्थित राहिले. भक्तिभावाच्या वातावरणात महाप्रसादाचे वितरण करण्यात आले असून अनेक भाविकांनी प्रसादाचा लाभ घेत समाधान व्यक्त केले.

या प्रसंगी महापौर सौ. ज्योतीताई गाडे व उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांचा नागरी सत्कार करण्यात आला. तसेच सौ. शीतलताई अजय ढोणे (नगरसेविका), सागर मुर्तडकर (नगरसेवक), मयुरीताई सुशांत जाधव (नगरसेविका), श्रीनिवास बोज्ञा (अध्यक्ष – पद्मशाली पंचकमिटी), श्री गणेश (बंडू) विद्ये (अध्यक्ष – श्री मार्कंडेय देवस्थान ट्रस्ट), संतोष बिज्ञा व महेंद्र बिज्ञा, सुरज जाधव आदींची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिसरातील ज्येष्ठ नागरिक व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. अनिल बोगा, नारायण येमूल (आण्णा), चंद्रकांत बोगा (आण्णा), शामराव बोगा, सतीश चिलका, शंकर दंडी, सुभाष श्रीपत, भुमेश अल्ली, धोंडीराम गोंधळे, रमेश बोगा, चंद्रकांत अल्ली (सर), नरेश कांबळे, बालराज रोल्ला, राजाराम दंडी, शरद बल्लाळ, प्रभाकर बोगा, संजय गुरुड, चंद्रकांत दंडी, अशोक बोगा, गणेश येनगुपटला, व्यंकटेश दंडी, पोपट तांबे, जयंत बोगा, रविंद्र बिज्ञा, हरिष बोगा, पुरुषोत्तम येरगुंटला, सचिन सांगळे (सर), यशवंत दंडी, राकेश बोगा, किरण बोगा, संजय क्यादर, अशोक बिज्ञा, भिमराज कोटा, गणेश आडेप, पुरुषोत्तम बोगा, लालु रंगा, गोरख बोगा, गणेश बोगा, ऋषिकेश आडेप, हर्षद आडेप, आनंद दंडी, नरेश कोडम, निलेश कुचन आदींनी नियोजनबद्धरित्या जबाबदाऱ्या पार पाडल्या.

या दोन दिवसांच्या धार्मिक उत्सवामुळे पंचरंग गल्ली परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. भाविकांनी सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केला. मंदिराचा वर्धापनदिन उत्सव अत्यंत उत्साहात आणि भक्तिभावात झाल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले, असे प्रतिपादन मंदीराचे संस्थापक अध्यक्ष राजेन्द्र बोगा यांनी केले.

# गुरुकुल कॅम्पस येथे 'बाळासाहेब गोंटला' सभागृहाचे उद्घाटन

## विद्यार्थ्यांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ : महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते लोकार्पण



'बाळासाहेब गोंटला' सभागृहाचे उद्घाटन महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपमहापौर धनंजय जाधव होते. कार्यक्रमाची सुरुवात कोनशीलाची फीत कापून करण्यात आले.

नगर – एकता एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी संचलित डॉ. पी.ए. इनामदार प्राथमिक व माध्यमिक विद्यालय गुरुकुल कॅम्पस तपोवनरोड, अहिल्यानगर येथे 'बाळासाहेब गोंटला' सभागृहाचे उद्घाटन महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपमहापौर धनंजय जाधव होते. कार्यक्रमाची सुरुवात कोनशीलाची फीत कापून करण्यात आले. याकार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे पुष्पाताई गोंटला, उद्योजक महेश येले, लक्ष्मी वॉचचे संचालक संजीव मंचे व संचालिका व पुणे म.न.पा. माजी नगरसेविका कोमल मंचे, विणा येले, अरुण लखापती, शशिकांत जाधव, संस्थेचे अध्यक्ष एन.ए.पठाण, शाला समिती चेअरमन अनिल साळुंके, लक्ष्मीकांत गरड, देविदास डहाळे, समीर पठाण विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कुंदा झोंड, गुरुकुल इंग्लिश मिडीयम स्कूल च्या प्राचार्या दीप्ती कराळे, महाराष्ट्र कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य शुभम टेमकर आदी उपस्थित होते.

चेअरमन अनिल साळुंके यांनी विद्यालयाच्या प्रगतीबद्दल उपस्थितांना माहिती दिली.

कार्यक्रमाप्रसंगी महापौर ज्योतीताई गाडे यांनी आपल्या भाषणात शालेय जीवनातील आठवणी सांगताना केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून विद्यार्थ्यांच्या सुक्त गुणांना वाव मिळणे आवश्यक आहे. समाजभुषण बाळासाहेब गोंटला यांच्या नावाने उभारलेले हे सभागृह भविष्यात अनेक उत्तम वक्ते, कलाकार आणि खेडाळू घडविण्याचे केंद्र ठरेल. विद्यालयाने राबविलेला हा उपक्रम कौतुकास्पद आहे.

उपमहापौर धनंजय जाधव यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यालयाच्या प्रगतीत भौतिक सुविधांचा वाटा मोठा असतो. विद्यालयाला कोणतेही सहकार्य करण्यास मी सदैव तत्पर असेल. हे आधुनिक सभागृह केवळ सांस्कृतिक कार्यक्रमासाठीच नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण बौद्धिक विकासासाठी उपयुक्त ठरेल असे प्रतिपादन केले व आपल्या भाषणाने विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत केले.

सूत्रसंचालन शिक्षिका वैशाली कर्डिले यांनी तर अध्यक्षीय सूचना सना शेख, अनुमोदन सरोज धाडीवाल यांनी केले. शितल रहाणे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिल्पा शिंदे, सबा शेख, प्रियंका बोरुडे, अमोल निमसे, अभिजित गवारे, सबिहा शेख, सानिया शेख, सविता शेळके, ममता कोरी, राधा चौधरी, अक्षय बोरुडे, योगिता मोहिते, अनिता कुमावत, श्रीजी विश्वनाथन, सना शेख, सलमान पठाण, आसिफ पठाण, ज्योती मुर्तडकर, विमल पोतखुले यांनी परिश्रम घेतले.

# विद्यार्थ्यांनी दातांच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे

## डॉ. उद्धव शिंदे यांचे प्रतिपादन



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वडारवाडी येथे आयोजित मोफत दंत तपासणी शिबिरात विद्यार्थ्यांची तपासणी करताना डॉ. अतुल मडावी.

नगर – विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी असून लहानपणापासूनच दातांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी केले.

स्नेहबंध सोशल फौंडेशन, इंडियन डेंटल असोसिएशन व साई डेंटल क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वडारवाडी येथे विद्यार्थ्यांसाठी मोफत दंतचिकित्सा तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता घोडके तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

या शिबिरात साई डेंटल क्लिनिकचे डॉ. अतुल मडावी यांनी विद्यार्थ्यांच्या दातांची तपासणी केली. यावेळी डॉ. ओंकार भालसिंग व डॉ. शिल्पा इमुनवार यांनी सहकार्य केले. विद्यार्थ्यांना दातांची किड ओळखण्यासाठी 'ट्रॅफिक सिग्नल' पद्धतीने मार्गदर्शन करण्यात आले. या पद्धतीत हिरवा, पिवळा व लाल सिग्नलच्या माध्यमातून दातांच्या स्थितीबाबत सोप्या पद्धतीने माहिती देण्यात आली.

डॉ. अतुल मडावी यांनी सांगितले, समाजातील काहीशा दुर्लक्षित घटकांतील विद्यार्थ्यांना योग्य वैद्यकीय सेवा मिळणे गरजेचे आहे. शारीरिक आरोग्यासोबतच मौखिक आरोग्यही तितकेच महत्त्वाचे असून विद्यार्थ्यांनी लहानपणापासून दातांच्या स्वच्छतेची सवय लावून घ्यावी.

या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दातांची स्वच्छता कशी राखावी, दातांच्या समस्या कशा ओळखाव्यात तसेच नियमित तपासणीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

# सुभाष मुथा यांचे धार्मिक क्षेत्रातील समर्पित भावनेने केलेले कार्य कौतुकास्पद : सीए राजेश शहा



कापड बाजार जैन मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा यांना जैन मंदिर ट्रस्टीपदी ४१ वर्षे आणि अध्यक्षपदी ३३ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांचा ट्रस्टी मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

नगर – ऐतिहासिक अहिल्यानगर शहराला समाजासाठी निस्वार्थी भावनेने काम करणारांची मोठी परंपरा आहे. यात जैन मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा यांचे नाव अग्रस्थानी आहे. तब्बल ४१ वर्षांपासून ते जैन मंदिराचे ट्रस्टी असून ३३ वर्षांपासून ते अध्यक्षपदी विराजमान आहेत. साधू भगवंताची सेवा करण्याची त्यांना आवड आहे. मंदिरात नित्यनेमाने धार्मिक कार्यक्रम आयोजित करून ते सकल संघाला यात सहभागी करून घेतात. सर्व ट्रस्टी मंडळाला व सकल संघाला सोबत घेऊन धार्मिक कार्यक्रम दिमाखात पार पाडण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात. त्यांचे समाजासाठीचे योगदान अतुलनीय असून नवीन पिढीसाठी ते प्रेरणास्रोत आहेत, असे प्रतिपादन कापड बाजार बाजार जैन मंदिराचे ट्रस्टी सी.ए. राजेश शहा यांनी केले.

कापड बाजार जैन मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा यांना जैन मंदिर ट्रस्टीपदी ४१ वर्षे आणि अध्यक्षपदी ३३ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांचा ट्रस्टी मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी राजेश शहा बोलत होते. याप्रसंगी ट्रस्टी संघवी लालचंद कासवा व डॉ. सागर पटवा यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

सीए राजेश शहा पुढे म्हणाले की, सुभाष मुथा यांची सर्वांना सोबत घेऊन चालण्याची हातोटी विलक्षण आहे. प्रत्येक धर्म कार्यात ते झोकून देऊन काम करत असतात. त्यांच्या कार्यकाळात श्री संभवनाथ मंदिराच्या जिर्णोद्धाराचे काम मार्गी लागले. आदेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार पूर्ण झाला.

श्री आदेश्वर कॉलनी वेळप्रसंगी कटुता पत्करून जुन्या भाडेकरूंकडून विना मोबदला सामोपचाराने संपूर्ण खाली करून घेण्यात आली. चार मजली श्राविका उपाश्रय उभारण्यात आले. स्टेशन रोडवरील हुंडेकरी चाळ पूर्ण जुन्या भाडेकरूंच्या ताब्यात होती. सुभाष मुथा यांनी संबंधित भाडेकरूंशी संवाद साधून सदर जागा खाली करून घेतली. आता संपूर्ण जागा संघाच्या ताब्यात आहे. चातुर्मास हा जैन परंपरेतील आराधना पर्व आहे. अनेक आचार्य भगवंत, साधू भगवंत, साध्वीजी भगवंत व वीर सैनिक यांचे यशस्वीरित्या निर्विघ्नपणे आराधना पूर्वक चातुर्मास पार पाडले. अहिल्यानगर जिल्ह्यातील व इतर ठिकाणच्या विविध जैन मंदिराची उभारणी, जिर्णोध्दारासाठी मोठा भाऊ या नात्याने देणग्या देण्यात आल्या आहेत. याशिवाय वेळोवेळी गोरक्षण संस्थांना गाईंच्या हिरव्या चाऱ्यासाठी निधी दिला जातो. गायींना कत्तेलखान्यांकडे जाण्यापासून वेळोवेळी वाचवण्यात येतं. सामाजिक, धार्मिक कार्याचा आदर्श सुभाष मुथा यांनी निर्माण केला आहे. नवीन पिढीसाठी विविध उपक्रम राबवून त्यांना सुसंस्कारित करण्यासाठी ते कायम प्रयत्नशील असतात.

सुभाष मुथा म्हणाले की, मला घरातून आणि साधू भगवंताकडून समाजकार्य, धार्मिकतेचे बाळकडू मिळाले आहे. त्यामुळे पूर्वीपासूनच धर्म कार्याची आवड आहे. जैन मंदिराचा ट्रस्टी आणि अध्यक्ष म्हणून काम करताना सर्व सहकारी ट्रस्टींचे व सकल संघाचे मोलाचे सहकार्य लाभत असते. सर्वांना सोबत घेऊन काम करताना खूप समाधान लाभते. गुरू भगवंताच्या शिकवणुकीचा जास्तीत जास्त प्रसार होणे आवश्यक आहे. त्यामुळेच आदर्श समाज निर्माण होऊ शकतो. युवा पिढीला धार्मिकतेकडे वळविणे ही आपली जबाबदारी आहे. सर्व ट्रस्टी मंडळाने केलेला सन्मान आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा देणारा आहे.

याप्रसंगी ट्रस्टी विनोद शहा, जितेंद्र पोरवाल, जयकुमार पुंगलिया, प्रितम मुथा, महेंद्र मेहेर, महेश पोरवाल, विजय मुथा, राजू बी. शहा, संजय बेदमुथा, दीपक शहा, जगदीश शहा आदींसह ट्रस्टी व सहयोगी उपस्थित होते.

# सीए फायनल परिक्षेत भाग्यश्री बाप्ते उत्तीर्ण



नगर – आयसीएआय आयोजित चार्टर्ड अकौंटंट अंतिम परीक्षेत भाग्यश्री बाप्ते–कलढोणे या उत्तीर्ण झाल्या आहेत. अपयश येत गेले तरी खचून न जाता स्मार्ट स्टडी करत राहील्यास विजयश्री नक्कीच खेचून आणता येते, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. मेहनत आणि जिद्द तसेच आई–वडील सौ. केशर आणि अर्जुन बाप्ते यांचकडे पाहून मिळणारे प्रोत्साहन तसेच पती ओमकार कलढोणे यांचा पाठिंबा असल्यामुळे छोट्या बाळाला सांभाळून त्यांनी हे यश संपादन केले आहे.

त्यांचे शालेय शिक्षण भिंगार हायस्कूल येथून तर महाविद्यालयीन शिक्षण रेसिडेन्शियल कॉलेज येथून झाले आहे. त्यांनी आर्टिकलशिप सीए सुशील जैन यांच्याकडे पूर्ण केली असून त्यांना राजस्थान येथील सीए अजय आणि सचिन अगरवाल तसेच CAPN नहार, सीए देसरडा, सीए भंडारी, सीए अभय कटारिया यांचे मार्गदर्शन लाभले.

किशोर उपरे, गणेश उपरे, शिवम भंडारी यांनी समजा तर्फे त्यांचा सत्कार केला तसेच सहकारी सीए शैला गोरे आणि सीए हृशी खोसे यांनी त्याचप्रमाणे भिंगार देवांग कोष्टी समाज तसेच विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.



वीज तारांच्या शॉर्ट सर्किटमुळे शेतातील गव्हाला आग लागून झालेले नुकसान.

# वीज तारांच्या शॉर्ट सर्किट मुळे शेतातील गव्हाला आग, सुमारे १ एकर गहू जळाला, शेतकऱ्याचे मोठे नुकसान

नगर – प्रमाणापेक्षा जास्त लूज असणाऱ्या वीजवाहक तारा एकमेकांना चिटल्याने लागलेल्या आगीत खडकी (ता.नगर) येथील सौ. रोहिणी प्रकाश निकम यांच्या शेतातील एक एकर पेक्षा जास्त गहूं जळून गेला. त्यामध्ये त्यांचे एक लाखांपेक्षा जास्तीचे नुकसान झाले आहे. ही घटना ९ मार्च रोजी दुपारी घडली.

खडकी गावठाण शेजारी रोहिणी प्रकाश निकम यांचे गट नंबर १५ चे क्षेत्र आहे. यामध्ये गहू असून तो काढणीला आला आहे. या शेतातून जाणाऱ्या वीजवाहक तारा खूपच खाली आलेल्या आहेत. या तारा व्यवस्थित कराव्यात अशी मागणी त्यांनी वारंवार महावितरण कर्मचारी आणि अधिकारी यांच्याकडे केलेली होती. पण कोणीही त्यांच्या मागणीकडे लक्ष दिले नाही. सोमवारी दुपारी अडीचच्या दरम्यान या वीजवाहक तारा एकमेकांना चिकटल्याने आगीचे लोळ गव्हाच्या पिकात पडले.

काढणीला आलेला गहू पूर्णपणे वाळलेला असल्याने गव्हाने पेट घेतला आणि आग वाढत गेली. गव्हाचे शेत गावाच्या जवळ असल्याने गावातील चंद्रकांत कोठुळे (मेजर), अमित सुडगे, राहुल कोठुळे, तनवीर शेख, सुधाकर उमाप, केतन निकम, सुनिल कोठुळे, केतन रोकडे, निखिल निकम यांनी धावत गव्हाच्या शेतात शिरले आणि त्यांनी आग विझवली. पण तोपर्यंत एक एकर पेक्षा जास्त गव्हाचे पीक जळून गेले होते. यामुळे रोहिणी प्रकाश निकम यांचे एक लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

# फ्लेक्स लावण्यावरून वाद; रिक्षासह दुकानातील काचांची तोडफोड

नगर – शहरातील चितळे रोड परिसरात असलेल्या मिरावली दर्गा येथे फ्लेक्स बोर्ड लावण्यावरून झालेल्या वादानंतर दोन तरुणांनी राडा घातल्याची घटना ९ मार्च रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या घटनेत रिक्षा आणि दुकानाच्या काचांची तोडफोड करण्यात आली असून, तोफखाना पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एजाज शेख (रा. चितळे रोड) आणि अतुल दिलीप चुत्तर (रा. कोहीनूर गार्डन, माळीवाडा) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. यातील आरोपींनी फ्लेक्स बोर्ड लावण्यावरून वाद घातला आणि त्यानंतर आपापसात झुंज देत सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केले.

यावेळी तिथे उपस्थित असलेले पोलीस हवालदार रावसाहेब शंकर खेडकर यांनी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र, आरोपींनी पोलिसांच्या सूचनेकडे दुर्लक्ष करत वाद चालूच ठेवला. याप्रकरणी पोलीस हवालदार रावसाहेब खेडकर यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून एजाज शेख आणि अतुल चुत्तर यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३२४ (२), १९४ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



यशवंत माध्यमिक विद्यालय शिराळ येथील मुख्याध्यापक शिवाजी धामणे यांचा सेवानिवृत्तीबद्दल सपत्नीक सत्कार करण्यात आला.

# संस्थेतील कमर्चारीच खरी ताकद

## जी डी खानदेशे यांचे प्रतिपादन; मुख्याध्यापक शिवाजी धामणे यांचा निरोप समारंभ

नगर – अ.नगर जिल्हा मराठा समाज संस्थेतील सर्व कर्मचारीच खरी ताकद असून त्यामुळेच संस्था जिल्हातील प्रमुख शैक्षणिक संस्था आहे, असे प्रतिपादन संस्थेचे मा.सचिव जी डी खानदेशे यांनी व्यक्त केले.

यशवंत माध्यमिक विद्यालय शिराळ येथील मुख्याध्यापक शिवाजी धामणे हे नुकतेच सेवा निवृत्त झाले. त्यांच्या निरोप समारंभ कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी संस्थेचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे, सहसचिव मुकेश मुळे, प्राचार्य दत्ता पा. नारळे, मा.जिल्हा परिषद बाळासाहेब हराळ, मा.प्राचार्य मनोहर कारंडे, प्रा.सुनील जाधव, मा.उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक प्रकाशजी भागानगरे, केंद्रप्रमुख संजय धामणे, शिक्षणाधिकारी अशोक कडूस, अशोक म्हस्के, टांगळ सर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा.संचालक नंदकुमार शिर्के, यशवंत विद्यालयाचे सर्व सहकारी, नातेवाईक मित्र परिवार उपस्थित होते.

खानदेशे यांच्या हस्ते धामणे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना आठरे यांनी देखील धामणे यांच्या एकूण सेवेचा गौरव केला. यावेळी आठरे यांनी धामणे यांच्या पत्नी सौ. शितल धामणे यांचे देखील कौतुक केले. धामणे यांनी एकूण ३४ वर्ष सेवा केली. संस्थेच्या विविध शाखेत सेवा केली त्या प्रत्येक संस्थेतील अनेक विद्यार्थी आज उच्च पदावर काम करत, काही व्यवसाय करतात. हेच प्रत्येक कर्मचाऱ्याचे काम आहे. त्यामुळेच संस्था नावारूपाला येत असते.

धामणे यांनी देखील सत्काराला उत्तर देताना सर्वांचे आभार व्यक्त करून संस्थेला आर्थिक मदत केली. त्याच बरोबर स्वर्गीय माधवराव मुळे सामाजिक प्रतिष्ठाणला देखील सहकार्य केले. धामणे यांच्या सुनबाई स्नेहल तुषार धामणे यांनी मनोगत व्यक्त करून धामणे यांच्यातील व्यक्ती म्हणून असलेल्या गुणांचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनकर मुळे, स्मिता ठाकर, सविता घुने यांनी केले.

